बीड | मंगळवार,दि.२६नोव्हेंबर २०२४ | वर्ष४रे | अंक११०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

## विशेष संपादकीय

### संविधान व मूलभूत कर्तव्ये


संविधान निर्मात्यांनी अतिशय कष्टाने देश घडविण्यासाठी निर्माण केलेल्या भारतीय संविधानाचे पावित्र्य जपणे म्हणजे संविधानिक मूल्यांचे आचरण करणे होय. आचरण म्हणजे निस्वार्थीपणे कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावी लागणार. संविधानात नागरिकांच्या मूलभूत हक्क व अधिकाराचा अंतर्भाव आहे. संविधानाच्या प्रास्ताविकेत समाविष्ट आहे की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकता व एकात्मता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, लोकशाही, गणराज्य प्रस्थायी करायचे आहे. संविधानाचा हा निश्चय व निर्धार नागरिक कर्तव्य पार पाडल्याशिवाय पूर्णत्वास येऊ शकत नाही. हक्क आहेत तर सोबतच कर्तव्येही आहेतच. हक्क व कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देशाच्या नागरिकांनी हक्क व अधिकाराबाबत जागरूक व आग्रह असताना कर्तव्यपालनाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.लोकशाही व्यवस्थेत, प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यपरायण आणि जबाबदारी यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते तेव्हा नागरिकांना हक्काबरोबर कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी मूलभूत कर्तव्याचा समावेश १९७६च्या ४२व्या घटनादुरुस्तीद्वारे करण्यात आला. संविधान निर्मात्यांनी संविधानात नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांच्या समावेश केलेला नव्हता. तो नंतर करण्यात आला, परंतु आजही ही कर्तव्ये दुर्लक्षित आहेत. बहुसंख्य लोकांना संविधानच माहीत नसल्यामुळे हक्क व कर्तव्ये याबाबत ते अनभिज्ञ व उदासीन आहेत. संविधानाच्या जागृती अभियानामुळे हळूहळू जाणीव होऊ लागेल. संविधान दिनी, व्यक्तीच्या हक्कांसोबतच कर्तव्याची चर्चा होणे फार महत्त्वाचे व आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या भाग-३ मध्ये मूलभूत हक्क व अधिकार दिले आहेत. भाग-४मध्ये राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आहे. मार्गदर्शक तत्त्वांचे नीतीनिर्देश हे आपल्या संविधानाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. हे वैशिष्ट्य संपूर्णतः भारतीय असून या देशात सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे हे संविधानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भारतीय संविधानाने सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाची हमी दिली आहे. मूलभूत हक्क म्हणून सहा प्रकारचे हक्क संविधानाच्या अनुच्छेद १२ ते ३५मध्ये आहेत. १. समतेचा हक्क २. स्वातंत्र्याचा हक्क ३. पिळवणुकीविरुद्धचा हक्क ४. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क ५. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क आणि ६. घटनात्मक उपाययोजनेचा हक्क. अर्थातच या हक्क-अधिकारांवर सार्वजनिक सुव्यवस्था, नीतीमत्ता व आरोग्य यासाठी काही निर्बंध व मर्यादा घातल्या आहेत.मूलभूत हक्कासोबतच कर्तव्ये आहेत आणि असायलाच पाहिजे. ही नागरिकांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत. संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे. ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास स्फूर्ती मिळाल्यास त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे. भारताची सार्वभौमकता, एकता व एकात्मता उन्नत राखणे, त्यांचे संरक्षण करणे. आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे. धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे. आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशांचे मोल जाणून तो जतन करणे. अरण्ये, सरोवर, नद्या व वन्यजीवसृष्टी यासुद्धा नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगणे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद, शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे. राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल, अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करणेसाठी झटणे. यासोबतच सहा ते चौदा वर्षेपर्यंतच्या बालकांचे आई-वडील किंवा पालक त्यांच्या बालकांना किंवा पाल्यांना जे लागू असेल त्याप्रमाणे शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतील. अशी ही ११ मूलभूत कर्तव्ये बहुसंख्य नागरिकांना माहितच नाहीत. परंतु लोकशाही व्यवस्थेनुसार जबाबदारीने राज्यपद्धती करणाऱ्यांनासुद्धा पुरेशी ठाऊक नाहीत.मूळ संविधानात मूलभूत कर्तव्ये नसताना यांचा अंतर्भाव करण्याची काय गरज होती, असे प्रश्न विचारले जाऊ शकतात. नागरिकांना कर्तव्यपालनाची जाणीव करून देऊन राष्ट्राच्या विकासाच्या प्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग मिळविणे हा यामागील उद्देश आहे व तो योग्यच आहे. लोकांनी, लोकांचे व लोकांसाठी चालविलेले सरकार म्हणजे लोकशाही म्हटले जाते. लोकांची कर्तव्ये निर्धारित करणे व कर्तव्याचे पालन करण्याचा आग्रह करणे हे देशहितासाठी व देश घडविण्यासाठीच आहे. नागरिकांनी देशाच्या कारभारात लक्ष द्यावे, सहभाग नोंदवावा हे अपेक्षित आहे. म्हणूनच ७३ व ७४च्या घटनादुरुस्तीमुळे लोकांचा सहभाग गावपातळीपर्यंत वाढतो आहे. तरीही मूलभूत कर्तव्यांची जाणीव नागरिकांना करून देण्याचे अभियान राबविण्यात गरज आहे. हेही लक्षात घेतले पाहिजे की, मूलभूत कर्तव्यांचा समावेश संविधानात झाला, परंतु या कर्तव्यपालनासाठी कोणतेही कायदेशीर पाठबळ दिले गेले नाही. मूलभूत कर्तव्यांचे स्वरूप राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे जशी आहेत त्याप्रमाणेच आहे. मार्गदर्शक तत्त्वाच्या परिपूर्ततींसाठी न्यायालयात दाद मागण्याची तरतूद संविधानात नसली तरी उच्च व सर्वोच्च न्यायालये

पान २ वर...




## मुख्यमंत्रीपदाबाबत साशंकता

**चर्चेतले:** एकनाथ शिंदेंचे भावनिक आवाहन



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुतीने स्पष्ट बहुमत प्राप्त केले असले तरी आता मुख्यमंत्रीपदावरून रस्सीखेच सुरू आहे. शिवसेना आणि भाजपा अशा दोन्ही पक्षाचे नेते, कार्यकर्ते मुख्यमंत्री पद आपल्याच पक्षाला मिळावे, यासाठी आग्रही आहेत. शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी शिवसेनेचे नेते मैदानात उतरले असून प्रसारमाध्यमांसमोर तशा प्रकारच्या प्रतिक्रियाही दिल्या जात आहेत. तसेच काही नेत्यांनी शिवसैनिकांना मुंबईत येण्याचे आवाहन केल्यामुळे असंख्य कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने रवाना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. यातून परिस्थिती चिघळू नये, यासाठी आता एकनाथ शिंदे यांनी स्वतःहून सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत भावनिक आवाहन केले असून

पान २ वर...

## संसदेत पहिला दिवस गोंधळाचा

**मतभेद:** दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, सोमवारी अदानी प्रकरणावरून दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. त्यामुळे कामकाज सुरू होताच काही मिनिटांमध्ये सभागृहे दिवसभरासाठी तहकूब करण्यात आली. सकाळच्या सत्रामध्ये लोकसभा व राज्यसभेचे कामकाज सुरू होताच काँग्रेस व इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी अदानी समूहाच्या लाचखोरी प्रकरणावर चर्चेची मागणी केली. लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी ही मागणी फेटाळत कामकाज चालवण्यात सहकार्य करण्याचे आवाहन केले. राज्यसभेमध्ये विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी नियम २६७ अंतर्गत अदानी प्रकरणावर चर्चेची मागणी केली. मात्र, अदानी यांच्याविरोधात अमेरिकेत गुन्हा दाखल झाला असून त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकत नाही, असे सभापती जगदीप धनखड यांनी केले. त्यानंतरही विरोधकांचा गोंधळ सुरूच राहिल्याने अखेर कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.


### लोकसभाध्यक्षांची गटनेत्यांशी चर्चा

पहिल्याच दिवशी सभागृह तहकूब करावे लागल्यानंतर बिर्ला यांनी तातडीने लोकसभेतील गटनेत्यांची बैठक घेतली. अधिवेशनामध्ये अनेक मुद्द्यांवर चर्चा करता येऊ शकते. पण, गदारोळामुळे कोणतीही सकारात्मक चर्चा होत नाही. त्यामुळे विरोधकांनी सभागृह चालवण्यासाठी सहकार्य करावे. सभागृहात घोषणाबाजी वा फलकबाजी करू नये, असे आवाहन बिर्ला यांनी केले

## अदानी'मधील गुंतवणूक फ्रान्सने थांबवली

**देशविदेश:** लाचखोरीच्या आरोपांनंतर सैरभैर

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी



अदानी समूहाचे संस्थापक-अध्यक्ष गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेच्या न्याय मंत्रालयाने ठेवलेल्या लाचखोरीच्या आरोपांनंतर त्यांचे गुंतवणूकदार सावध झाले आहेत. हे आरोप निकाली निघत नाहीत तोपर्यंत अदानी समूहाच्या कंपन्यांमध्ये नव्याने गुंतवणूक न करण्याचा निर्णय फ्रान्सच्या 'टोटलएनर्जीज एसई' या ऊर्जा क्षेत्रातील बलाढ्य कंपनीने सोमवारी जाहीर केला.टोटलएनर्जीज' ही अदानी समूहाच्या सर्वात मोठ्या परदेशी गुंतवणूकदारांपैकी एक कंपनी आहे. अदानी समूहाच्या अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील 'अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड' (एजीईएल) आणि 'अदानी टोटल गॅस लिमिटेड' (एटीजीएल) या कंपन्यांमध्ये त्यांनी गुंतवणूक केलेली आहे. मात्र, गुंतवणूक करताना आपल्याला कथित भ्रष्टाचाराच्या तपासाची

पान २ वर...

## उजव्यांचे समाजवादी रक्षाबंधन!

समाजवादाची समस्या ही की कधी ना कधी इतरांचे पैसे संपतात '', असे मार्गरिट थॅचर म्हणत. इतरांच्या पैशावर चालणारे धर्मार्थ कार्य म्हणजे समाजवाद असा त्याचा अर्थ. 'याचे काढायचे आणि त्याला द्यायचे' अशा अर्थाचा इंग्रजी वाक्प्रचारही हेच सांगतो. सरकारचे असे काही नसते; ते फक्त एका वर्गाकडून काढून घेते आणि त्याच्या मते गरजू वर्गास देते. दोन ताजे विधानसभा निवडणुकांचे निकाल या वास्तवाचे स्मरण करून देतात. पहिला अर्थातच महाराष्ट्रातील आणि दुसरा झारखंड या 'बिहारी'वळणाच्या राज्यातील.या दोन्ही राज्यांत विधानसभा निवडणुका झाल्या आणि महाराष्ट्रापेक्षा कित्येक पटींनी लहान असलेल्या झारखंडात त्या दोन टप्प्यांत घेतल्या गेल्या. ते का यास काही उत्तर नाही. असो. महाराष्ट्रात भाजप सत्तेवर होता आणि झारखंडात तो सत्तेच्छू होता. महाराष्ट्रात अडीच वर्षांपूर्वी जे भाजपने केले ते झारखंडात तो अद्याप तरी करू शकलेला नाही. शिवसेना, राष्ट्रवादीचे अनेक नेते चौकशी यंत्रणांच्या नुसत्या निमंत्रणाच्या शक्यतेने गळपटले आणि भाजपवासी झाले. पण झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन या मर्द मराठे म्हणवणाऱ्यांपेक्षा खरे शूर. ते तुरुंगात गेले, केंद्रीय यंत्रणांच्या आडून लढणाऱ्या भाजपशी त्यांनी दोन हात केले आणि पुन्हा विजयी झाले. महाराष्ट्राच्या तुलनेत कित्येक पट विखारी प्रचार त्या राज्यात झाला. कोणत्याही तऱ्हेने सीमावर्ती राज्य नसूनसुद्धा 'बिहारी घुसपेठियां'चा बागुलबुवा उभा करण्याचा अकारण प्रयत्न झाला. पण राजकीय शहाणीव असलेले झारखंडीय बधले नाहीत. त्यांनी स्थानिक सोरेन यांच्याच बाजूने निर्णायक कौल दिला. याचा अर्थ धर्माच्या आधारे दुभंग निर्माण करण्याचा,'एक है तो सेफ है' हे स्वघोषित तत्त्व धर्माच्या मुद्द्यावर सोयीस्कररीत्या वापरण्याचा प्रयत्न यशस्वी होतोच असे नाही. म्हणून महाराष्ट्रातील विजयाचे सारे श्रेय 'बटेंगे तो कटेंगे'स देण्याची गल्लत करण्याचेही कारण नाही. एकाच वेळी होऊनही या दोन राज्यांचे निकाल परस्पर विरोधी लागले. तरीही या दोन्ही निकालांत एक समान सूत्र दिसते.लाडकी बहीण' हा तो समान धागा. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांप्रमाणे झारखंडच्या सोरेन यांनीही त्यांची 'मैया योजना' राबवली. महाराष्ट्राचा या अशा सार्वजनिक धनवाटपाच्या योजनांचा हा पहिलाच अनुभव. झारखंडात मात्र २०११ पासून या अशा योजना सुरू आहेत. अलीकडच्या काळात या लाडक्या बहिणींना राजकीय व्यवहारात केंद्रस्थानी आणले ते मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी. या लाडक्या बहिणींनी चौहान यांची हरत असलेली निवडणूक जिंकून दिली. महाराष्ट्र आणि झारखंड या दोन्हीही राज्यांनी चौहान यांचे अनुकरण केले आणि या दोघांनाही चौहान यांच्या प्रमाणे लाडक्या बहिणींनी विजयी केले. आगामी काळात दिल्ली, बिहार अशा राज्यांत निवडणुका होऊ घातल्या आहेत. राजधानी दिल्लीतील श्रावणबाळ अरविंद केजरीवाल या निमित्ताने अशा आणखी काही योजनांस 'आप'लेसे करतील. झारखंडचे मूळ राज्य असलेल्या बिहारचे नितीश कुमार हे तर या अशा नौटंकीचे नटसम्राट. तेही अशा योजना आणतील. मग उत्तर प्रदेश. त्या राज्याचे मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी असल्याने ते बहनांसाठी बरेच काही करतील. म्हणजे पुढील काळात लोकानुनयाची स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत जाईल. एकदा का निवडणुकीय यश हे आणि हेच उद्दिष्ट ठेवले की ते साध्य करण्यासाठी आर्थिक आणि अन्यही शहाणपणांस तिलांजली देणे ओघाने आलेच.

हा सरकारी समाजवाद. शेतकरी कर्जमाफी, अन्नसुरक्षा कायदा इत्यादी मार्गांनी हा समाजवाद याआधीही प्रत्यक्षात आणला जात होताच. मुक्त भांडवलशाहीचे खंदे पुरस्कर्ते आणि अभ्यासू भाष्यकार मनमोहन सिंग हे जेव्हा पंतप्रधानपदी होते तेव्हाही त्यांची भाषा आर्थिक उजवी होती तरी वाटचाल मात्र डावीकडचीच होती. त्यानंतर नरेंद्र मोदी यांची कारकीर्द सुरू झाली. मोदी आणि त्यांचे सवंगडी हे नेहरूवादी समाजवादाचे कडवे टीकाकार. जे जे नेहरू-स्पर्शित ते ते या सर्वांसाठी अस्पृश्य. तथापि नेहरूंच्या आर्थिक समाजवादाचे सच्चे अनुयायी हे मोदीच ठरतात हे त्यांच्या गेल्या दहा वर्षांतील धोरणांवरून लक्षात यावे. नेहरूंचे अनुकरण जितके काँग्रेसवाल्यांनी केले नसेल तितके ते कथित नेहरू-विरोधी मोदी यांनी केले. समाजवादीय भोंगळपणाची एक त्रुटी म्हणजे इतरांच्या पैशावर केलेल्या धर्मादाय कार्याचे मोजमाप देता न येणे. तो समाजवाद विचारकेंद्राच्या डावीकडील सत्ताधीशांनी अमलात आणला. विद्यमान सत्ताधीश उजवीकडील. पण समाजवादी भोंगळपणा तोच. सरकारी दानधर्माच्या मोजमापनाबाबत 'ते' आणि 'हे' दोघेही सारखेच. मग तो मुद्दा देशातील ८० कोटी (?) गरिबांस मोफत धान्य वाटपाचा असो वा गरिबांस घरे, स्वच्छतागृहे बांधण्यासाठी दिलेल्या आर्थिक साहाय्याचा असो. केवळ दानधर्म. हे दान किती सत्पात्री वा अपात्री आहे याचा विचारही नाही. तो करण्याची गरजही नाही. एका बाजूला आर्थिक महासत्ता होण्याची भाषा आणि दुसरीकडे त्याच महासत्तेतील ६०-६५ टक्के वा अधिक जनता 'भुकीकंगाल' असल्याची कबुली. हा विरोधाभास आहे हे लक्षात घेण्याचीही कोणाची इच्छा नाही.

# भारतीय संविधानाचा अमृतमहोत्सव

भारताचे संविधान निर्माण करण्यासाठी १९४६ मध्ये संविधान सभा स्थापन करण्यात आली . इ.स.१९४७ मध्ये भारताला ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य दिल्यानंतर, संविधान सभेने भारताची पहिली संसद म्हणूनही काम केले.९ डिसेंबर १९४६ रोजी सकाळी ११ वाजता संविधान सभेचे पहिले अधिवेशन सुरू झाले, तेथे २११ सदस्य उपस्थित होते. १९४७ च्या सुरुवातीस, मुस्लिम लीग आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी सामील झाले नव्हते आणि संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेच्या अंतिम मसुद्याला मंजूरी दिली. २४ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेचा परिणाम झाला आणि संविधान सभा ही भारताची अस्थायी संसद बनली . संसदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका होईपर्यंत.

भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ अन्वये, संविधान सभा सार्वभौम बनवली आणि तिला कायदेमंडळाचा दर्जा सुद्धा प्राप्त झाला. यानुसार संविधान सभेला दोन प्रमुख कार्ये देण्यात आली ती म्हणजे स्वतंत्र भारतासाठी घटना निर्मिती करणे आणि देशासाठी कायदे करण्याचे काम संविधान सभेचे होते. याव्यतिरिक्त संविधान सभेने मे १९४९ मध्ये भारताच्या राष्ट्रकुलाच्या सदस्यत्वाला अनुमोदन दिले. २२ जुलै १९४७ रोजी संविधान सभेने भारताचा राष्ट्रीय ध्वज स्वीकृत केला. त्याचे डिझाईन आंध्रप्रदेशचे पि. वेंकय्या यांनी तयार केले होते.२४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेने भारताचे राष्ट्रगीत आणि राष्ट्रगान स्वीकृत केले.२४ जानेवारी १९५० रोजी झालेल्या संविधान सभेच्या शेवटच्या बैठकीमध्ये २६ जानेवारीपासून लोकसभेच्या निवडणुका होईपर्यंत संविधान सभेला तात्पुरती संसद म्हणून घोषित करण्यात आले. तसेच निवडणुका होईपर्यंत भारतीय गणराज्याचे पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद यांची नेमणूक करण्यात आली.आदी महत्वाची कार्य संविधान सभेने केली.डॉ. राजेंद्र प्रसाद यांची संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून तर हरेंद्र कुमार मुखर्जी यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. मुखर्जी हे बंगालमधील ख्रिश्चन आणि कलकत्ता विद्यापीठाचे माजी कुलगुरू होते. संविधानसभेच्या अल्पसंख्यांक समितीचे अध्यक्षपदी, भारत प्रजासत्ताक झाल्यानंतर मुखर्जी यांना पश्चिम बंगालचा राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आले. घटना निर्मिती करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या.घटना निर्मिती प्रमुख




समिती मसुदा समिती होती.मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांनी सविस्तर घटनेचा मसुदा तयार करून सादर केला जो सार्वजनिक चर्चे साठी प्रकाशित करण्यात आला.राज्यघटनेच्या मसुद्यावर



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

चर्चा करण्यात आली आणि दुरुस्ती प्रस्तावित व लागू करण्यात आली. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात तज्ज्ञांच्या समितीने राज्यघटनेचा अवलंब केला. ही महत्त्वाची भूमिका म्हणता येईल. संविधान सभेने संविधान बनवण्याच्या वेगवेगळ्या कामांसाठी एकूण २२ समित्या नेमल्या होत्या. यापैकी आठ प्रमुख समित्या आणि इतर उपसमित्या होत्या.प्रमुख समित्यांमध्ये मसुदा समिती होती तिचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर,केंद्रीय ऊर्जा समिती - जवाहरलाल नेहरू,केंद्रीय घटना समिती - जवाहरलाल नेहरू, प्रांतीय घटना समिती - वल्लभभाई पटेल,मुलभूत हक्क, अल्पसंख्यांक ,आदिवासी आणि अपवर्जित क्षेत्रांची सल्लागार समिती - वल्लभभाई पटेल. या समित्याशिवाय उपसमित्या स्थापन करण्यात आल्या ज्यामुळे संविधान सर्वसमावेशक आणि सर्वांच्या विचार विनिमयाचे होईल. यात मूलभूत अधिकार उपसमिती - जे.बी कृपलानी, अल्पसंख्याकांची उपसमिती - हरेंद्र कुमार मुखर्जी, उत्तर-पूर्व सीमांत आदिवासी क्षेत्र आणि आसाम वगळलेले आणि अंशतः वगळलेले उप-समिती - गोपीनाथ बोर्दोलोई,वगळलेले आणि अंशतः वगळलेले क्षेत्र (आसामच्या व्यतिरिक्त) उपसमिती - ए.व्ही. ठक्कर, प्रक्रिया समितीचे नियम - राजेंद्र प्रसाद, राज्ये समिती (राज्यांशी वाटाघाटी करण्यासाठी समिती) - जवाहरलाल नेहरू,सुकाणू समिती - राजेंद्र प्रसाद, राष्ट्रीय ध्वज तदर्थ समिती - राजेंद्र प्रसाद संघटनेच्या कार्य समितीची बैठक - ग.वा. मावळणकर,सभा समिती - बी.पी. सीतारामय, भाषा समिती - मोटुरी सत्यनारायण, व्यवसाय समितीचा आदेश - के. एम. मुन्शी अशा एकूण २२ समित्या घटना निर्मिती प्रक्रियेत होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चा नंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतीय संविधान आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो.भारत सरकारने आंबेडकरांचे १२५ वे जयंती वर्ष साजरे केले जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २६ नोव्हेंबर २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन साजरा केला.संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात २६ नोव्हेंबर हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २४ नोव्हेंबर २००८ ला आदेश काढून '२६ नोव्हेंबर' हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते.हे महाराष्ट्राच्या महापुरुषांच्या वैचारिक विचारांचा वारसा सांगतो.त्यामुळे संविधान दिनाची सर्वप्रथम कल्पना ही महाराष्ट्राची होती आणि तत्कालीन महाराष्ट्रातील काँग्रेस सरकारच्या काळातील ही घोषणा.३९५ कलमं असलेल्या राज्यघटनेत घटनादुरुस्तीचा अधिकार देण्यात आला आहे. संविधानातील अनुच्छेद ३६८ नुसार घटनादुरुस्ती करता येते.त्यामुळे अनेक घटनादुरुस्त्या झाल्या आहेत. कायद्याच राज्य, सर्वांना समान हक्क,अधिकार, स्वातंत्र्य, समता,बंधुता,न्याय देण्यासाठी हे संविधान आहे केवळ कायद्याचा दस्तऐवज नाही. भारताला प्रजासत्ताक करणाऱ्या संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होतात.संविधानाचा अमृतमहोत्सव साजरा करताना इथल्या नागरिकांना प्रजेची सत्ता आहे अशी अनुभूती कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ देईल हीच काय ती अपेक्षा.

# मी सत्तेत बसवणारा माणूस

## मागणी:लक्ष्मण हाके म्हणाले विधान परिषदेवर बोळवण नको

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

एकीकडे मुख्यमंत्री आणि संपूर्ण मंत्रिमंडळाचा पेच निर्माण झालेला असताना दुसरीकडे ओबीसी आरक्षणासाठी नेतृत्त्व करणाऱ्या लक्ष्मण हाकेंनी थेट शिक्षणमंत्री किंवा महसूल मंत्री बनण्याची इच्छा व्यक्ती केली आहे. मी सत्तेत बसवणारा माणूस आहे, त्यामुळे विधान परिषदेवर माझी बोळवण करू नका, असंही ते म्हणाले. आज ते माध्यमांशी बोलत होते. दरम्यान, त्यांच्या वक्तव्यावरून त्यांच्यावर टीका होऊ लागल्याने त्यांनी नंतर त्यावर स्पष्टीकरण दिलं आहे. लक्ष्मण हाकेंना आज विधान परिषदेबद्दल प्रश्न विचारण्यात आला. ओबीसी समाजात त्यांचं नेतृत्त्व आहे. त्यामुळे त्यांच्या ओबीसी आंदोलनामुळे महायुतीच्या बाजूने निकाल लागला असल्याची चर्चा ओबीसी समाजात आहे. त्यामुळे त्यांना विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. या चर्चेबाबत त्यांना विचारलं असता त्यांनी विधान परिषदे काय घेऊन बसलात, मला कॅबिनेट पद दिलं पाहिजे, असं ते म्हणाले. एकनाथ शिंदेंनी १० टक्के आरक्षणाचं आश्वासन दिलं आहे. पण जरांगेंना ते कळलं नाही. ते पवार साहेब, टोपे साहेब, रोहित साहेब करत बसले, असं म्हणत लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर टीका केली. तसंच, कॅबिनेट पदाचीही मागणी केली. ते म्हणाले, विधान परिषद काय? अर्ध्या लोकसंख्येचा आवाज असलेल्या माणसाला विधान परिषद काय देताय? कॅबिनेट पद दिलं पाहिजे. शिक्षणमंत्री, महसूलमंत्री पद दिलं पाहिजे. विधान परिषदेवर बोळवण करता काय? अर्ध्या लोकसंख्येचा आवाज आहे हा. मी कोणाकडे भीक मागणार नाही. मी सत्तेत बसवणारा माणूस आहे, विधान परिषद काय घेऊन बसलात? महाराष्ट्रात सत्ता बदलण्याचं काम आम्ही केलंय, असं लक्ष्मण हाके म्हणाले.

मी जर तर ची भाषा बोलत नाही. मी त्यावेळी पत्रकार परिषद घेईन. मला एकनाथ शिंदेंनी चांगली ऑफर दिली तर जाईन, असं लक्ष्मण हाके म्हणाले.कॅबिनेट पद आणि विधान परिषदेबद्दल वक्तव्य केल्यानंतर लक्ष्मण हाके यांच्यावर सर्वत्र टीका होऊ लागली. त्यामुळे त्यांनी सोशल मीडिया खात्यावरून या वक्तव्यावरून स्पष्टीकरण दिलंय. ते म्हणाले, मी मंत्री पदाची मागणी केली नाही तसा माझा उद्देश नव्हता, मला विधानपरिषदेबद्दल प्रश्न विचारला तेव्हा उपहासत्मक बोललो, माझ्यासाठी ओबीसीचे प्रश्न महत्वाचे आहेत.

## पान सहा वरून

**राज्यात महायुतीचा**

उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शाम भाऊ पडूळे, शिवसेना जेष्ठ नेते सुरेश तात्या शेटे, महिला आघाडी जिल्हा सहसंपर्कप्रमुख डावकर ताई, शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख अजय जाधव, शिवसेना विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, शिवसेना तालुका संघटक गणेश मस्के, सुदर्शनजी धांडे, सुनील गवते, गजानन कदम, शिवसेना शहर संघटक नवनाथ शिंदे, शिवसेना शहर सह संघटक ऋषिकेश जोगदंड, शिवसेना उप शहर प्रमुख हनुमानप्रसाद पांडे, शिवसेना उपशहर प्रमुख अक्षय काशीद, माजी सरपंच संदीपान बडगे, शिवसेना विभाग प्रमुख सदाशिव सुर्वे , शिवसेना विभाग प्रमुख शहर रणजीत बुंदिले, सरपंच अंकुश गायकवाड,अमोल मामा जाधव, उत्कर्ष धपाटे, गणेश काळे, अनिल खांडे, अविनाश पाटोळे,तुकाराम गोरे, गणेश डांगे, राहुल कोकाटे, अजय सुरवसे, प्रताप जगताप, गणेश काळे व आदी उपस्थित होते.**मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच असावेत** : तळागाळातील माणसांची जान असणारे सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्रभरातील जेष्ठ, तरुणाई, शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी यांच्यात आमचा सक्षम आधार अशी विश्वास निर्माण करणारे शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश प्राप्त केले असून आता शिंदे साहेबच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी सर्वोपरी योग्य चेहरा आहे व शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री बनावेत अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे व राज्याच्या विकासाठी शिंदे साहेबांच्याच हातात मुख्यमंत्री पदाची धुरा द्यावी अशी एक शिवसैनिक म्हणून महायुतीच्या जेष्ठ श्रेष्ठींना विनंती आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपली भावना व्यक्त केली.

## पान एक वरून

**संविधान व मूलभूत कर्तव्ये**

प्रसंगी सक्रिय होऊन जनहितासाठी व कल्याणकारी निर्देश सरकारला देत असतातच. मूलभूत कर्तव्ये ही नागरिकांसाठी असली तरी राज्य या कर्तव्यपूर्तीतून आपली सुटका करून घेऊ शकत नाही. संविधानाच्या प्रास्ताविकेतील ध्येय व उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सरकारला सगळ्याच आवश्यक उपाययोजना कराव्या लागतात. तरीपण नागरिकांनी आपली जबाबदारी राष्ट्रनिर्मितीसाठी निरपेक्षपणे पार पाडलीच पाहिजे.संविधान सभेत समारोपाचे भाषण करताना बाबासाहेब म्हणाले होते की, ''घटना कितीही चांगली असली तरी ती अमलात आणणारे लोक जर चांगले नसतील तर त्या घटनेचे मातेरे होते. मात्र घटना कितीही वाईट असली तरी ती राबविणारे लोक चांगले असतील तर ती घटना निः संशय चांगली ठरते.'' संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद हेसुद्धा नागरी सेवेचे महत्त्व विशद करताना म्हणाले होते की, ''राज्यघटनेत काही असेल अथवा नसेल, राज्यघटना काही सांगो अथवा न सांगो, देशाचे कल्याण या देशाचे शासन-प्रशासन कोणत्या प्रकारे केले जाते यावर अवलंबून राहील आणि शाळा-प्रशासन चालविणारे लोक कोण वा कसे आहेत त्यावर अधिक अवलंबून राहील.'' हे म्हणणे आजही प्रासंगिक आहे. यावर चिंतन होण्याची गरज आहे. 'लोक' या शब्दात नागरिक, सनदी अधिकारी, लोकप्रतिनिधी इत्यादी सर्वांचाच समावेश आहे. कर्तव्य व जबाबदारीची सतत प्रेरणादायी आठवण व्हावी म्हणून संविधानावर श्रद्धा व निष्ठा बाळगण्याची व संविधानानुसार कर्तव्ये पार पाडण्याची शपथ संविधानाच्या तरतुदीनुसार घेतली जाते. कर्मचारी-अधिकारीसुद्धा शासकीय सेवेत प्रवेश करताना संविधानाची शपथ घेतात. मात्र हे बहुसंख्य आपण घेतलेल्या शपथेशी इमान ठेवतात असे नाही. देशात म्हणून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. 'नीतीमत्ता' हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा आणि ही व्यवस्था यशस्वी होण्याची पायाभूत शर्त आहे. संविधान दिन साजरा करताना 'नीतीमत्ता' वृद्धिंगत होईल, असे कार्यक्रम राबविले पाहिजे.हक्क व प्रतिष्ठेसाठी आग्रह करताना आपल्या कर्तव्यांचाही आग्रह नागरिकांनी धरला पाहिजे. जे संविधानात नाही, त्या गोष्टीपासून स्वतःच परावृत्त केले पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य हे व्यक्तिस्वार्थात परावर्तित करणे धोकादायक आहे. धर्मनिरपेक्षता हा संविधानाचा गुणधर्म आहे. नागरिकांनी या तत्त्वाचा सन्मान करून आचरण केले तर धर्मांधतेची वर्तणूक होणार नाही. धर्मांधतेकडून दहशतवादाकडे तर आपली वाटचाल होत नाही ना याचा गांभीर्याने विचार व्हायला पाहिजे. असहिष्णुतेमुळे व अतिरेकी स्वरूपाच्या अप्रिय वर्तनामुळे देशात अराजकता निर्माण झाली तर त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागणार आहेत. स्वार्थ व वर्चस्वासाठी, सत्ता व संपत्तीसाठी संविधान विपरीत वर्तणूक निश्चितच धोकादायक आहे.आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ला केलेल्या भाषणाचे पुन्हा स्मरण होणे गरजेचे आहे. बाबासाहेब म्हणतात, ''भारत आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवील की पुन्हा गमावेल, हा विचार मला अस्वस्थ करतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की, त्याने आपले स्वातंत्र्य स्वकियांच्या फितुरीमुळेच गमावले आहे. देशफितुरीचा इतिहास मला सर्वाधिक बेचैन करतो. इतिहासाची पुनरावृत्ती होईल का? या विचाराने मी चिंताग्रस्त आहे. जातींच्या व संप्रदायांच्या स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रूंसोबतच, भिन्न व परस्परांची विचारप्रणाली असणाऱ्याच बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देश मोठा मानतील? मला माहीत नाही, परंतु एवढे मात्र निश्चित की, जर राजकीय पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशाने मोठे मानले तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धाराने लढलेच पाहिजे.'' देश सर्वत्र व देशहितच सर्वोच्च मानून जबाबदारी पार पाडणे हीच नागरिकांच्या मूलभूत कर्तव्याची नैतिकता आहे. संविधान दिनापासून पुन्हा दुसऱ्या वर्षी येणाऱ्या संविधान दिनापर्यंत दरवर्षी दररोज संविधानिक मूल्यानुसार आचरण करणे हा नागरिकांचा निर्धार म्हणजे संविधान दिवस होय. संविधान दिनाच्या सदिच्छा!

**मुख्यमंत्रीपदाबाबत साशंकता**

कार्यकर्त्यांची समजूत घातली आहे.२६ नोव्हेंबर २०१९ रोजी अस्तित्वात आलेल्या १४ व्या विधानसभेची मुदत आज (२६ नोव्हेंबर) संपणार आहे. त्यामुळे आज मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय होऊन शपथविधी होणार का? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भाजपाने निवडणुकीत सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. त्यामुळे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच मुख्यमंत्रीपद मिळावे, यासाठी भाजपाकडून दबाव सुरू आहे. तसेच शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते आणि कार्यकर्तेही मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. शिवसैनिक मोठ्या संख्येने वर्षा निवासस्थानी किंवा मुंबईत येऊ नयेत, यासाठी एकनाथ शिंदे यांनी खबरदारी घेतली आहे. त्यांनी मध्यरात्री एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर करत भावनिक आवाहन केले. ते म्हणाले, महायुतीच्या प्रचंड विजयानंतर राज्यात पुन्हा एकदा आपले सरकार स्थापन होणार आहे. महायुती म्हणून आपण एकत्रित निवडणूक लढवली आणि आजही एकत्रच आहोत. माझ्यावरील प्रेमापोटी काही मंडळींनी सर्वांना एकत्र जमण्याचे, मुंबईत येण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या या प्रेमासाठी मी अत्यंत मनापासून ऋणी आहे. मात्र अशा पद्धतीने माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये, असे आवाहन मी करतो. पुन्हा एकदा माझी नम्र विनंती की शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी वर्षा निवासस्थान किंवा अन्य कुठेही एकत्र जमू नये. समर्थ आणि समृद्ध महाराष्ट्रासाठी महायुती भक्कम होती आहे आणि यापुढेही भक्कमच राहील.

**राज्यात बिहार पॅटर्न राबवा शिवसेना**

शिंदे यांचे निकटवर्तीय खासदार नरेश म्हस्के यांनी 'बिहार पॅटर्न'चा मुद्दा अधोरिखित केला आहे. बिहारमध्ये नितीशकुमार यांच्या पक्षाला २४३ पैकी ४३ जागा मिळाल्यानंतरही मुख्यमंत्रीपदासाठी भाजपने पाठिंबा दिला. राज्यात बिहार पॅटर्न राबविण्यात यावा यासाठी शिंदे पक्षाची व्यूहरचना सुरू आहे. भाजप मित्रपक्षाला संपवते असा प्रचार शिवसेना ठाकरे पक्षाने अडीच वर्षांत केला. हा अपप्रचार आहे हे सिद्ध करण्याची संधी भाजपला चालून आली आहे, असे म्हस्के यांनी सांगितले.


**अदानी'मधील गुंतवणूक फ्रान्सने थांबवली**

कल्पना नव्हती असे या कंपनीने स्पष्ट केले आहेटोटलएनर्जीज'कडून सोमवारी एक निवेदन प्रसृत करण्यात आले. गौतम अदानी आणि त्यांच्या अन्य दोन कार्यकारी अधिकाऱ्यांनी २६५ दशलक्ष डॉलरची कथित लाच दिल्याचे आम्हाला समजले असे त्यात नमूद केले आहे. ''या आरोपांमध्ये 'एजीईएल' किंवा 'एजीईएल'शी संबंधित कंपन्यांचे नाव नाही. अदानी समूहातील व्यक्तींविरोधातील आरोप निकाली लागत नाहीत तोपर्यंत 'टोटलएनर्जीज' अदानी समूहामध्ये कोणतीही नवीन गुंतवणूक करणार नाही'' असे कंपनीकडून सांगण्यात आले.

एजीईएल'मध्ये 'टोटलएनर्जीज'चे १९.७५ टक्के समभाग आहेत. त्याशिवाय 'एजीईएल'च्या सौर व पवनऊर्जा निर्मिती करणाऱ्या तीन सहकंपन्यांमध्ये त्यांची ५० टक्के गुंतवणूक आहे. तसेच, 'टोटलएनर्जीज'चे 'एजीईएल'मध्ये ३७.४ टक्के समभाग आहेत.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## हॅप्पी बर्थ डे



रूपा गांगुली (अभिनेत्री)

राखी सावंत (अभिनेत्री)

सुधीर गाडगीळ (मुलाखतकार)

एस. के. तरवडे (निवृत्त आयपीएस)

मिहिर शाह (फिजिओथेरपिस्ट)

कांतीलाल बाबुराव उमप (निवृत्त. आयएएस)

प्रतापराव जाधव (केंद्रीय मंत्री)

आरोही अविनाश राऊत जन्म ११ वाढदिवस

पद्मश्री बैनाडे (उपजिल्हाधिकारी)

अविनाश तुकाराम राऊत वृत्तपत्र विक्रेता विक्रोळी पूर्व

अलोक साबदे (क्रीडा)

## वेचक

### उच्च श्रेणी लघुलेखक इंग्रजी-गट'ब' अराजपत्रित पदाचा निकाल जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी) :** उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) गट- ब (अराजपत्रित) या संवर्गाच्या मुलाखती दिनांक २७ सप्टेंबर, १६ व १७ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या. या पदाचा निकाल महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असल्याचे आयोगाने कळविले आहे.

### औषधीद्रव्ये विभाग - गट-'अ'मधील संवर्गाचा निकाल जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी) :** वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, गट-'अ' मधील सहयोगी प्राध्यापक संवर्गाचा निकाल जाहीर करण्यात आले आहे. हा निकाल आयोगाच्या



संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. सहयोगी प्राध्यापक, जीवरसायनशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, गट-अ सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गट-अ, सातारा सहयोगी प्राध्यापक, अस्थिव्यंगोपचारशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गट-अ.आणि सहयोगी प्राध्यापक, शरिररचनाशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गट-अ, परभणी. या संवर्गाचा निकाल जाहीर करण्यात आला असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.

### निवडणुकीत ३४२ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

**मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीत अनेक उमेदवारांना आपले डिपॉझिटही राखता आले नाही. मुंबईच्या निवडणूक आखाड्यात उतरलेले राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्यासह मनसे, वंचित बहुजन आघाडी, बसपाबरोबरच जवळपास ३४२ उमेदवारांना अल्प मते मिळाली आहेत. त्यामुळे त्यांनी निवडणूक आयोगाकडे भरलेले डिपॉझिट जप्त होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरताना संबंधित उमेदवारावा निवडणूक आयोगाकडे १० हजार रुपये अनामत रक्कम भरावी लागते. निवडणूक निकालानंतर संबंधित उमेदवाराला झालेल्या एकूण मतदानापैकी किमान १/६ म्हणजे १६.३३ टक्के एवढी मते घेतली असतील, तर त्यांनी भरलेली डिपॉझिटची रक्कम परत केली जाते. त्यापेक्षा कमी मते मिळाल्यास सदरची रक्कम जप्त केली जाते. मुंबई शहर आणि उपनगरातील ३६ विधानसभा मतदारसंघांतून ४२० उमेदवार निवडणूक रिंगणात होते. शनिवारी जाहीर झालेल्या निकालानुसार ३४२ उमेदवारांना आपले डिपॉझिट गमवावे लागणार असल्याचे दिसत आहे.

# मुंबईत महिला ठरल्या विजयाच्या शिलेदार

## पुरुषांपेक्षा महिला मतदानाचा टक्का अधिक



**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

लोकसभा निवडणुकीत पुरुषांच्या बरोबरीने महिलांनीही आपला मतदानाचा अधिकार बजावला आहे. मुंबई शहरात महिलांनी १.४३ टक्के तर उपनगरात ०.६६ टक्के अधिक मतदान केले आहे. मुंबई शहरात एकूण ५२.६९ टक्के तर उपनगरात ५६.३९ टक्के मतदान झाले आहे.

शहर जिल्ह्यात एकूण २५ लाख ४१ हजार ८१० मतदार असून त्यात १३ लाख ३९ हजार २९९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये सात लाख १० हजार १७४ पुरुष मतदार आणि सहा लाख २९ हजार ०४९ महिला मतदारांनी तसेच इतर ७६ मतदारांनी मतदान केलेले आहे. मतदानाची एकूण सरासरी ५२.६९ टक्के आहे.

उपनगर जिल्ह्यात एकूण ७६ लाख ८६ हजार ०९८ मतदार असून त्यात ४३ लाख ३४ हजार ५१३ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावलेला आहे. यामध्ये २३ लाख ५८९ पुरुष मतदार आणि २० लाख ३३ हजार ६५४ महिला मतदारांनी तसेच इतर २७० मतदार मतदान केलेले आहे. त्यामुळे सर्व ३६ पैकी २३ मतदारसंघांमध्ये महिलांच्या मतदानाचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत जवळपास दिसून आले आहे. आजवर महिला मतदारांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत फारच कमी दिसून येत होते; परंतु आता हे प्रमाण यंदाच्या निवडणुकीत पुरुष मतदारांच्या तुलनेत त्यांच्या आसपास दिसून आले.

**महिलांची टक्केवारी जास्त असलेल्या विधानसभा**

दहिसर - ०.६० टक्के
मागाठाणे - १.२६
दिंडोशी - १.९
कांदिवली प. - ०.३३
चारकोप - ०.२२
मालाड प. - ०.८८
गोरेगाव - ०.८३
वर्सोवा - ०.५६
अंधेरी प. - ०.२७
अंधेरी पू. - ०.५१
विलेपार्ले - ०.१७
चांदिवली - २.६६
मानखुर्द - २.६१
अणुशक्तीनगर -२.५
चेंबूर - ०.०५
कुर्ला - १.०४
कलिना - ०.५४
वांद्रे प. - १.७१
धारावी - २.७९
शीव - १.८८
वरळी - २.५१
शिवडी - १.३२
भायखळा - ०.४७
कुलाबा - ५.१५

**पुरुषांची टक्केवारी जास्त असलेल्या विधानसभा**

बोरिवली - १.६७
मुलुंड - १.४
विक्रोळी - ०.९९
भांडुप प. - ०.०८
जोगेश्वरी - ०.३४
घाटकोपर प. - ०.०८
घाटकोपर पू. - ०.१४
वांद्रे पू. - ०.९३
वडाळा - १.१४
माहीम - १.३१
मलबार हिल - ०.३३
मुंबादेवी - ०.५८

**शहरातील मतदान टक्केवारी**

पुरुष - ५१.९९
स्त्री - ५३.४२
तृतीयपंथी - १.४३

**उपनगरातील मतदान टक्केवारी**

पुरुष - ५६.०९
स्त्री - ५६.७५
तृतीयपंथी - ३२.२२

प्रत्येक निवडणुकीत पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या कमी असते; परंतु यंदाच्या तुलनेत महिला मतदारांच्या टक्केवारीत वाढ झालेली दिसून येत आहे.

### उग्र दर्पामुळे नागरिक हैराण

## वाशी, कोपरखैरणेत वायू प्रदूषण लक्षणीय वाढ



**◆ तुर्भे (वार्ताहर) :**

मागील दोन दिवसांपासून तापमानात घट झाली असून, हवेत गारठा वाढला आहे. त्यामुळे सर्वत्र धुके पसरू लागले आहे. मात्र रात्री पडणाऱ्या धुक्याचा गैरफायदा घेत एमआयडीसीतील रासायनिक कंपन्यांनी हवेत प्रदूषित वायू सोडण्याचा सपाटा सुरू केला आहे. या भागातील नागरिकांना रात्रीच्या वेळी दूषित उग्र दर्पामुळे श्वास घेण्यास त्रास होत आहे. धुक्याच्या आडून होणारे वायू प्रदूषण थांबविण्यात यावे, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

नवी मुंबई शहरात महापे औद्योगिक क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. घणसोली, कोपरखैरणे विभाग हे औद्योगिक पट्ट्याला लागूनच वसलेले आहे. त्यामुळे औद्योगिक पट्ट्यात होणाऱ्या प्रदूषणाचा फटका या विभागातील नागरिकांना अधिक प्रमाणात बसत आहे. कोपरी गाव, बोनकोडे सेक्टर २६ या परिसरात मोठ्या प्रमाणात हवेत धूलिकण आढळून येत आहेत. त्यामुळे परिसरात दुर्गंधी येत असून नागरिकांना मळमळ वाटणे, श्वास घेण्यास अडचणी येत आहेत. या भागात वाढणाऱ्या वायू प्रदूषणाबाबत वारंवार तक्रारी करून ही संबंधित विभागाकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या माध्यमातून शहरात हवा गुणवत्ता मोजमाप करणारी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.

बेलापूरमध्ये १४१ एक्यूआय, नेरूळ १५१ एक्यूआय, कोपरी पाडा वाशी १८४ एक्यूआय, कोपरखैरणे १३९ एक्यूआय आहे. एमआयडीसी क्षेत्राला लागून वसलेल्या रहिवासी क्षेत्रात रात्रीच्या वेळी हवेत अधिक प्रमाणात धूलिकण आढळत आहेत.

## कंटेनर अपघातामुळे मुंब्रा बायपास मार्गावर वाहतूक कोंडी

**कळवा :** ठाण्याहून मुंब्र्याकडे जाणाऱ्या एका कंटेनरचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कंटेनर डिव्हायडरला धडकून उलटल्याची घटना रविवारी सकाळी नऊच्या सुमारास घडली. या अपघातग्रस्त कंटेनरमधील ऑईल रस्त्यावर सांडल्याने या मार्गावर चार तास वाहतूक कोंडी झाली. याचा वाहनचालकांना मनःस्ताप सहन करावा लागला. वाड्याहून न्हावा-शेवा येथे मुंब्रा बायपास रस्त्यावरून जाणाऱ्या एका खासगी कंपनीचा कंटेनर २० टन वजनाचा रेझून केमिकल घेऊन जात असताना हा अपघात घडला. मुंब्रा बायपास मार्गावर मुंब्रा देवी मंदिराजवळील क्रेशर मशीनजवळ हा अपघात झाला. कंटेनरचालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने हा कंटेनर डिव्हायडरला धडकून उलटला. यानंतर या अपघातग्रस्त कंटेनरमधील ऑईल रस्त्यावर सांडल्याने या मार्गावर सुमारे चार तास वाहतूक कोंडी झाली. या घटनेची माहिती मिळताच मुंब्रा वाहतूक पोलीस, अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली.

## मतदानानंतरही ईव्हीएम पॉवर पॅक स्थिती ९९ टक्के दिसणे तांत्रिकदृष्ट्या वस्तूस्थितीजन्य

**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

मतदानानंतरही ईव्हीएम पॉवर पॅक स्थिती ९९ टक्के दिसणे ही बाब तांत्रिकदृष्ट्या वस्तूस्थितीजन्य असल्याचे १७२-अणुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघासाठीचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी दिवशी १७२-अणुशक्तीनगर मतदारसंघातील मतदान केंद्रात मतदानादिवशी ईव्हीएम मशीन पूर्ण दिवस वापरल्यानंतरही काही सीयुएस मध्ये ईव्हीएम पॉवर पॅक स्थिती ९९ टक्के दर्शविली गेली, याबाबत एका उमेदवाराने आक्षेप नोंदविला होता.

भारत निवडणूक आयोगाच्या ईव्हीएम मशीन संदर्भातील मार्गदर्शक सूचनांनुसार याबाबत वस्तूस्थितीदर्शक खुलासा करताना १७२-अणुशक्तीनगर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे की, ईव्हीएम पॉवर पॅक २००० मतांसह १सीयूसह ४ बीयूला जोडणी देण्यासाठीची रचना आहे. जेव्हा क्षमता जास्त असते तेव्हा व्होल्टेज





**निवडणूक निर्णय अधिकारी: विधानसभा मतदारसंघ १७२ - अणुशक्ती नगर**

खूप हळूहळू कमी होते परंतु जेव्हा बॅटरीची क्षमता 'थ्रेशोल्ड'च्या खाली कमी होते तेव्हा ते वेगाने घसरते. एकच बीयु आणि १००० पेक्षा कमी मते नोंदविली असताना हलके विद्युत प्रवाह असल्यास, बॅटरीचा प्रवाह कमी असतो आणि आऊटपुट व्होल्टेज ७.४ व्ही.च्या खाली जाऊ शकत नाही आणि त्यामुळे ९९ टक्के क्षमता दर्शविली जाऊ शकते.

त्यामुळे अशा परिस्थितीत ही एक सर्वसामान्य स्थिती असून, याबाबतचा आक्षेप अयोग्य असून अशाप्रकारे गैरसमज पसरविणे अयोग्य असल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिव्यांग उमेदवारांना मार्गदर्शक सूचना

### मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक उपलब्ध करुन देण्यात येणार

**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग व्यक्तींना भरपाई वेळ व दिव्यांग उमेदवार हे लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी त्यांना लेखनिक उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर 'दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना' प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखनिकाची मदत घेण्याची आणि अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह संदर्भीय शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार विनंती अर्ज सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.



आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुवादक(मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा गट-क च्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज, संबंधित सर्व कागदपत्रे तसेच प्रमाणपत्रे हे पडताळणी, अनुवाद चाचणीच्या वेळी सोबत मूळ प्रतींसह सादर करणे अनिवार्य राहील.

लेखनिकाची मागणी करणाऱ्या दिव्यांग उमेदवारांने या संदर्भात शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. ६ मधील "लेखनिक/ वाचक / प्रयोगशाळा सहाय्यक यांची शैक्षणिक पात्रता या परीक्षेकरिता असलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी असावी आणि उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एका टप्प्याने कमी असावी" या तरतुदीकडे विशेषत्वाने लक्ष वेधण्यात येत आहे. या परीक्षांकरिता किमान शैक्षणिक अर्हता, विविध विषयातील पदवी असल्याने लेखनिकाची कमाल शैक्षणिक अर्हता पदवीच्या एक टप्पा कमी म्हणजे १२ वी असणे आवश्यक आहे. या शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार दिव्यांग उमेदवाराने लेखनिकाची मागणी करणे आवश्यक आहे.

लेखनिक आणि/अथवा भरपाई वेळ आवश्यक असलेल्या उमेदवारांनी प्रमाणपत्रे पडताळणी/ अनुवाद चाचणीच्या वेळी प्रपत्र १/ प्रपत्र २, लक्षणीय दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र व नमुना क्रमांक ११ अशी कागदपत्रे सादर करावीत.

शारीरिक दिव्यांगत्व (दोन्ही हात बाधित/नसलेले) / मेंदुचा पक्षाघात असलेल्या उमेदवारांनी नमुना क्रमांक ११ सादर करणे आवश्यक नाही.

## राज्य विधानसभा निवडणुकीची अधिसूचना, राजपत्राच्या प्रती राज्यपालांना सादर



**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

भारत निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त हिरदेश कुमार व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची रविवारी राजभवन मुंबई येथे भेट घेऊन, त्यांना राज्य विधानसभा निवडणुकीच्या जाहीर झालेल्या निकालाची अधिसूचना-निवडून आलेल्या सदस्यांची यादी व राजपत्राची प्रत सादर केली. महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकांचे निकाल दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जाहीर करण्यात आले. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७३ मधील तरतूदीनुसार, या निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली.

सदर राजपत्र व अधिसूचनेच्या प्रती निवडणूक आयोगाचे उप मुख्य निवडणूक आयुक्त व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आज राज्यपालांना सादर केल्या.

यावेळी राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, भारत निवडणूक आयोगाचे सचिव सुमन कुमार दास व कक्ष अधिकारी निरंजन कुमार शर्मा हे देखील उपस्थित होते.

## कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'विधी विधान इंटर्नशिप'

**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

कायदेशीर प्रस्तावांची तपासणी करण्याची प्रक्रिया, विधेयक व अध्यादेशाचा मसुदा तयार करणे तसेच दुय्यम विधी विधान तयार करणे. याबाबतची माहिती राज्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी विधी विधान इंटर्नशिप उपक्रम २० जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाद्वारे शासनाच्या कामकाजाची माहिती, विधेयके, अध्यादेश, नियम, अधिसूचनांचे प्रारूप तयार करण्याबाबतची कार्यपद्धती, विधान मंडळात विधेयके पारित करण्याची कार्यपद्धती, विधी व न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद, संविधानातील कायदेविषयक तरतुदी व त्यांचा प्रत्यक्ष वापर, विविध कायदे व तरतुदींची माहिती, विधी व न्याय विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत कामाचा प्रत्यक्ष अनुभव, विविध विषयांवर व्याख्याने



तसेच संबंधित कार्यालयाना भेटी देण्याची रूपरेषा ठरविण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील विधी महाविद्यालये व विद्यापीठे यामधील ५ वर्षांच्या विधी पदवी अभ्यासक्रमाचे चौथ्या किंवा पाचव्या वर्षांत शिकत असलेले विद्यार्थी, ३ वर्षांच्या विधी पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी तसेच विधी पदव्युत्तर पदवीचे पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षात शिकत असलेले विद्यार्थी या विधी विधान इंटर्नशिपसाठी पात्र आहेत. तथापि, या उपक्रमासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय २८ वर्षांपेक्षा जास्त नसावे, असेही स्पष्ट करण्यात येत आहे.

पात्र विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठीचे ऑनलाईन अर्ज व संबंधित कागदपत्रे एआयसीटीइच्या http://internship.aicte-india.org या पोर्टलवर १५ डिसेंबरपर्यंत अपलोड करावेत. कागदपत्रांमध्ये एमएच सीईटी लॉ / सीएलटी गुणपत्रिका, एचएससी गुणपत्रिका तसेच शेवटच्या उत्तीर्ण परीक्षेची गुणपत्रिका अपलोड करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, १५ डिसेंबर २०२४ नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नसून अपूर्ण माहिती असलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

या इंटर्नशिप बॅच ३ करिता १२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. यात ५ वर्षांच्या विधी पदवी अभ्यासक्रमाचे ३ विद्यार्थी व ३ विद्यार्थिनी, ३ वर्षांच्या विधी पदवी अभ्यासक्रमाचे २ विद्यार्थी व २ विद्यार्थिनी तसेच विधी पदव्युत्तर व पदवी अभ्यासक्रमाचा १ विद्यार्थी व १ विद्यार्थिनीची निवड करण्यात येईल. या इंटर्नशिपचे ठिकाणी विधी विधान शाखा, विधी व न्याय विभाग, पाचवा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई हे असेल.

हे विधी विधान इंटर्नशिप यशस्विरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये १० हजार इतके विद्यावेतन देण्यात येणार असून कार्यअहवाल सादर केल्यानंतर त्यांना इंटर्नशिप प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

## सीटच्या वादातून तरुणाची हत्या

### घाटकोपरच्या प्लॅटफॉर्मवर जीवघेणा हल्ला

**◆ मुंबई (वार्ताहर) :**

घाटकोपर रेल्वे स्थानकावर एक धक्कादायक घटना घडली आहे. या हाणामारीत एका व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. किरकोळ वादातून झालेल्या भांडणाचा राग मनात ठेवत अल्पवयीन मुलाने एका प्रवाशावर जीवघेणा हल्ला केला होता. घटनेची माहिती मिळताच आरपीएफच्या पथकाने धाव घेत जखमी प्रवाशाला तातडीने रूग्णालयात नेले होते. मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

लोकल ट्रेनमध्ये सीटच्या वादातून एका अल्पवयीन मुलाने ३५ वर्षीय अंकुश भालेराव यांची हत्या केली. घाटकोपर रेल्वे स्थानकावर हा सगळा धक्कादायक प्रकार घडला. कुर्ला रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात एका अल्पवयीन मुलाला हत्येच्या आरोपाखाली आणि त्याच्या मोठ्या भावाला घटनेशी संबंधित पुरावे नष्ट करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. अल्पवयीन मुलीला डोंगरी बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे. आरोपीचा भाऊ मोहम्मद सनाउल्ला शेख उर्फ सोहेल याला स्थानिक न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. अंकुश भालेराव १४ नोव्हेंबरला सकाळी ९ वाजता टिटवाळ्याहून घाटकोपरला जाण्यासाठी फास्ट लोकल पकडत होते. यावेळी त्यांचा एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलासोबत सीटवर बसण्यावरून वाद झाला. त्यादरम्यान, अंकुश आणि त्याच्यासोबत प्रवास करणाऱ्या अन्य दोन प्रवाशांनी अल्पवयीन मुलाला मारहाण केली. दुसऱ्या दिवशी घाटकोपर स्थानकाच्या फलाटावर अल्पवयीन मुलाने अंकुशवर चाकूने हल्ला केला.

### २७ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत होणार मुलाखती

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून विविध पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर

**◆ मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या विविध संवर्गाच्या पदांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. दिनांक २७ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नवी मुंबई येथील सीबीडी बेलापूर कार्यालयात या मुलाखती घेण्यात येतील.

**तालुका क्रीडा अधिकारी**

संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या चाळणी छाननीअंती मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या





उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ५ व ६ डिसेंबर, २०२४ रोजी आयोगाच्या नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

**इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब**

इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या छाननीअंती मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ तसेच दिनांक ३ व ४ डिसेंबर, २०२४ या कालावधीत आयोगाच्या नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

**प्राध्यापक क्षयरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (गट-अ)**

विविध संवर्गाच्या पदभरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आलेल्या छाननीअंती,चाळणीअंती मुलाखतीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २७ व २८ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत आयोगाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई कार्यालयात आयोजित करण्यात आल्या आहेत.

**प्राध्यापक, क्षयरोगशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ ची**

मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात येतील. सहयोगी प्राध्यापक, शल्यचिकित्साशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ,ची मुलाखत दि. २७ नोव्हेंबर, २०२४, सह्योगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (धाराशिव) ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४, सहयोगी प्राध्यापक, नेत्रशल्यचिकीत्साशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (नंदुरबार)ची मुलाखत दि. २७ नोव्हेंबर, २०२४ सहयोगी प्राध्यापक, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ (परभणी)ची मुलाखत दि.२७ नोव्हेंबर, २०२४ सहयोगी प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ ची मुलाखत दि.२७ व २८ नोव्हेंबर, २०२४ सहयोगी प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, परभणी गट- अ ची मुलाखत दि.२७ व २८ नोव्हेंबर, २०२४ प्राध्यापक, विकृतीशास्त्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, गट-अ सिंधुदुर्गची मुलाखत दि.२८ नोव्हेंबर, २०२४ रोजी घेण्यात येतील.

## भटक्या कुत्र्यांचा उपद्रव प्रवासी हैराण

**◆ मुंबई (वार्ताहर) :**

सायन स्थानकात गेल्या अनेक दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत चालला आहे. त्यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत. सायन स्थानकातील फलाट क्रमांक एक ते चारवर भटक्या कुत्र्यांचा कळप हिंडत असतो. अनेकदा हे कुत्रे हिंसक होतात. प्रवाशांच्या हातातील साहित्य खेचून घेतात. बेसावध प्रवाशांच्या हातातील साहित्य अनेकदा खेचून कुत्रे पळून जातात. धावत्या लोकल सोबत धावतात. त्यामुळे दरवाजावर उभे राहून प्रवास करणारे प्रवासी घाबरून जातात. फलाट क्रमांक तीन व चारवरून जलद लोकल धावतात. या फलाटावरून जाणाऱ्या लोकलसोबत धावणाऱ्या कुत्र्यांमुळे अनेकदा दरवाजात उभ्या असलेल्या प्रवाशांची तारांबळ उडते. त्यामुळे एखाद्या प्रवाशाच्या जीवावर बेतण्याची शक्यता आहे.

हे भटके कुत्रे फलाटावर झोपतात. एखाद्या प्रवाशाचा चुकून कुत्र्याला पाय लागल्यास झोपलेले कुत्रे प्रवाशांना चावा घेण्याचा प्रयत्न करतात. भटक्या कुत्र्यांमुळे प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. स्थानकातील भटक्या कुत्र्यांना काही प्रवासी व श्वानप्रेमी खाद्यपदार्थ देत असल्याने अनेक भटके कुत्रे स्थानकात घुटमळत असतात. त्यामुळे कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. या गंभीर बनत चाललेल्या समस्येकडे रेल्वे प्रशासनाने तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी प्रवासी करत आहेत.

**सुविचार :** कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.


## अभूतपूर्व तितकेच अनपेक्षित....!

महाराष्ट्र विधानसभेचे निकाल सर्वार्थाने अभूतपूर्व ठरले. यापूर्वी कोणत्याही एका पक्षाला किंवा निवडणूकपूर्व आघाडीला इतक्या प्रचंड प्रमाणात यश मिळाले नव्हते, अगदी महाराष्ट्रात विरोधी पक्ष नावालाच होता त्या काळातही तत्कालिन एकसंध काँग्रेसलाही इतक्या जागा मिळविता आल्या नव्हत्या. हे यश जितके अभूतपूर्व आहे तितकेच ते अनपेक्षितही म्हणायला हवे. राज्यात विरोधी पक्ष अगदीच कमकुवत होता, अशी परिस्थिती नव्हती, उलट सहाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या आघाडीने अगदी दणदणीत यश प्राप्त केले होते. त्या निवडणुकीत विरोधी आघाडीने दीडशेपेक्षा अधिक विधानसभा मतदारसंघात आघाडी मिळविली होती. ४८ पैकी ३१ जागा विरोधकांनी जिंकल्या होत्या, त्या पृष्ठभूमीवर विधानसभा निवडणुकीत विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांच्या समोर चांगलेच आव्हान उभे राहिल, असाच तज्ज्ञांचा अंदाज होता. महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांची मतपेढीदेखील मजबूत असल्याचे मानले जात होते, शिवाय शेतकऱ्यांमध्ये वर्तमान सरकारच्या विरोधात चांगलाच रोष होता. अर्थात 'लाडकी बहिण' योजनेने वातावरण बऱ्यापैकी सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकले होते. ही योजना 'गेम चेंजर' ठरू शकते, याची कल्पना विरोधकांना बऱ्याच विलंबाने आली. आधी या योजनेच्या विरोधात न्यायालयात फिर्याद करण्यात आली, त्यानंतर या योजनेमुळे महाराष्ट्र कसे दिवाळखोरीत जाऊ शकते, हे सांगण्याचा प्रयत्न झाला, परंतु सरकारने नेटाने ही योजना राबविली, एवढेच नव्हे तर ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता लागू शकते हे लक्षात घेऊन दोन महिन्यांचे पैसे आगावू लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आले. एकाच वेळी खात्यात आलेल्या त्या तीन हजारांनी महिला वर्ग खूश झाला, त्यातच हे सरकार पुन्हा आले नाही तर ही योजना बंद होऊ शकते, हा प्रचार सत्ताधाऱ्यांकडून प्रभावीपणे करण्यात आला. ही योजना राज्यातील पन्नास टक्के मतदारांना आपल्यापासून दूर नेऊ शकते, हे लक्षात आल्यावर विरोधकांची धावपळ सुरू झाली. घाईघाईत विरोधकांनी आपल्या जाहीरनाम्यात याच योजनेच्या धर्तीवर अधिक रक्कम देणारी दुसरी योजना आणण्याचे वचन दिले, परंतु कदाचित तोपर्यंत बराच उशीर झाला होता. राज्यातील महिला वर्गाने महायुतीच्या पारड्यात अगदी भरभरून मतदान टाकले. या योजनेच्या लाभार्थी असलेल्या महिलांपैकी ऐंशी ते नव्वद टक्के महिला मतदारांनी बाकी सगळे मुद्दे गौण ठरवित महायुतीला मतदान केल्याचे स्पष्टच दिसत आहे. शिवाय लोकसभा निवडणुकीनंतर सावध झालेल्या भाजपने मराठा समाजाला कुठेही न दुखविता किंवा डिवचता इतर छोट्या-छोट्या समाजाची मोट बांधण्यास सुरूवात केली होती. त्याचा परिणाम म्हणून ओबीसी समुहातील बरेच समाज महायुतीच्या पाठीशी उभे राहिले, शिवाय मराठा समाजानेही लोकसभा निवडणुकीत ज्या एकजुटीने महायुतीला विरोध केला होता, तसे यावेळी झाले नाही. मराठवाड्यात मराठा आंदोलनाची धग अधिक होती. लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यातील संभाजीनगरची जागा वगळता इतर सगळ्याच जागांवर भाजप आघाडीचा दारूण पराभव झाला होता. परंतु यावेळी या विभागातील ४६ पैकी तब्बल ४० जागा महायुतीला मिळाल्या, यावरूनच मराठा समाज महायुती आणि महाआघाडीत विभागल्या गेल्याचे स्पष्ट दिसते. महाविकास आघाडी प्रचारात खूप मागे पडली असे काही नव्हते. शरद पवारांनी अनेक सभा घेतल्या, उद्धव ठाकरेंनीही जोरदार प्रचार मोहिम राबविली, काँग्रेसने राहुल गांधींना प्रचाराच्या मैदानात उतरविले, राज्यातील इतर नेत्यांनीही जोरदार प्रचार केला, परंतु शेवटी महायुतीचे आणि खास करून भाजपचे सुक्ष्म नियोजन प्रभावी ठरले असेच म्हणावे लागेल. 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है' सारख्या नाऱ्यांनी नाही म्हटले तरी बऱ्या प्रमाणात धार्मिक ध्रुवीकरण साधले, असे या निकालावरून दिसून येते. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचा प्रचार प्रामुख्याने 'गद्दारांना धडा शिकवा' याच मुद्याभोवती केंद्रीत राहिला, परंतु मतदारांना हे आवाहन फारसे भावले नसल्याचे दिसते. अशी अनेक कारणे आहेत ज्यामुळे महाआघाडीला मोठ्या पराभवास सामोरे जावे लागले, एकमात्र खरे की ही सगळी कारणे मान्य करूनही शेवटी महायुतीला इतके प्रचंड यश मिळणे अनपेक्षितच म्हणावे लागेल.

## शिंदे माघार घेणार....?

विद्यमान विधानसभेची मुदत मंगळवारी संपुष्टात येत आहे, त्यामुळे मंगळवारी किंवा त्या आधी नवे सरकार गठीत व्हायला हवे आणि ते गठीत होण्यास आता तसा काही अडथळा दिसत नाही. महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले असल्याने आमदारांची जमवाजमव करणे, त्यांची संमतीपत्रे गोळा करणे वगैरे भानगड नाही. तिन्ही पक्षांनी आपल्या विधिमंडळ नेत्याची निवड केल्यानंतर या नेत्यांनी राज्यपालांना सत्ता स्थापन करण्यासाठी संयुक्त पत्र देणे ही औपचारिकता पार पडली की नव्या सरकारच्या शपथविधीचा मार्ग मोकळा होणार. अर्थात त्यापूर्वी मुख्यमंत्री म्हणून कोण शपथ घेणार हा प्रश्न महायुतीला निकालात काढावा लागेल. त्यासाठी तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते दिल्लीत दाखल झाले आहेत. महायुतीतील अजित पवारांनी या आधीच मुख्यमंत्री पदावरील दावा मागे घेतला आहे. एकतर युतीत त्यांच्या पक्षाचे आमदार सर्वात कमी आहे आणि दुसरे म्हणजे सरकार स्थापन करण्यासाठी त्यांच्या पक्षाचा पाठिंबा असायलाच हवा, अशी परिस्थिती नाही. एकनाथ शिंदे सध्या मुख्यमंत्री आहेत आणि हे पद आपल्याकडे कायम राहावे असे त्यांना वाटणे स्वाभाविक असले तरी भाजपला मिळालेले घवघवीत यश पाहता भाजप यावेळी मुख्यमंत्रीपद आपल्या मित्रपक्षासाठी सोडण्याची शक्यता खूप कमी आहे. शिंदेंच्या शिवसेनेपेक्षा भाजपच्या आमदारांची संख्या दुपटीपेक्षा अधिक आहे आणि यावेळी सरकार स्थापन करण्यासाठी शिवसेनेवर अवलंबून राहण्यासारखी परिस्थितीदेखील नाही. त्यामुळे यावेळी एकनाथ शिंदेंना थोडी माघार घ्यावी लागू शकते आणि त्यासाठी ते तयारही होतील. त्यांच्या मंत्रिमंडळात देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री म्हणून सामील झाले होतेच, त्यामुळे आता फडणविसांच्या मंत्रिमंडळात त्यांना उपमुख्यमंत्री म्हणून सामील होण्यात कमीपणा वाटण्याचे तसे कारण नाही. एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री हा जुना फार्म्युला यावेळीही कायम राहिल असे दिसते. कदाचित शिंदेंकडून अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद देण्याची मागणी होऊ शकते, परंतु ही मागणी मान्य होण्याची शक्यता तशी कमीच आहे. एकूणच भाजपने मुख्यमंत्रीपद आपल्याकडेच राखण्याचा निर्णय घेतला तर शिंदेंना माघार घेणे भाग आहे.

### कटाक्ष




प्रा. डॉ. विनोद गायकवाड
9850324202
राजकीय अभ्यासक


## 'एक है तो सेफ है' - महायुतीचा महाविजय...

लोकसभेच्या निकालानंतर महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन होईल असे वाटत असतानाच शिंदे सरकारच्या बाजूने मतदारांनी कौल दिला. मतदानाची टक्केवारी वाढली तेव्हाच महायुतीला विजय मिळेल असा अंदाज बांधल्या गेला. महायुती विरुद्ध महाविकास आघाडीमध्ये झालेल्या निवडणुकीत महायुतीने बाजी मारली. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली. मनसे, वंचित, बविआ, सपा, स्वराज्य-प्रहार, एमआयएम इत्यादी पक्षही निवडणूक रिंगणात होते. महायुतीने एकतर्फी विजय मिळवीत २८८ पैकी २३० जागा जिंकत विशेष बहुमत मिळविले तर मविआला फक्त ४६ जागांवर समाधान मानावे लागेल. सपा व एमआयएमने खाते उघडले. स्वराज्य-प्रहार, बविआ, वंचित व मनसेला खातेही उघडता आले नाही. संभाजीराजे भोसले यांच्या स्वराज्य पक्षाचा पराभव राजेंचा पराभव करणारा ठरला. अमित ठाकरेंच्या पराभवाने राज ठाकरेंना मोठा धक्का बसला. ते तिसऱ्या स्थानावर राहिले. तेथे महायुतीच्या उमेदवाराचाही पराभव झाला. राज ठाकरेंच्या सततच्या बदलत्या भूमिकेचा फटका अमितला बसला. बारामतीतील युगेंद्र पवारांच्या पराभवाने शरद पवारांच्या तटबंदीला तडा गेला. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीचा तसेच आमदारांच्या अपात्रतेचा परिणाम या निवडणुकीत दिसेल असे वाटत असतानाच मतदारांनी शिंदेंच्या शिवसेनेला आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीला भरभरून स्वीकारले तर ठाकरेंच्या शिवसेनेला आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला नाकारले. मविआच्या मोठ्या नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला. लातूर देशमुखांचा गड होता, मात्र तिथेही भाजपाने विजय मिळविला. या मोठ्या विजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस ठरले. भाजपाने फडणवीसांच्या नेतृत्वात सलग तिसऱ्यांदा १०० च्यावर जागा निवडून आणल्या. १४८ पैकी १३२ जागांवर विजय मिळविणे हे ऐतिहासिक आहे. भाजपा विधानसभेतील सर्वात मोठा पक्ष ठरला. निवडून आलेले अपक्ष भाजपाकडे आल्यास संख्याबळ वाढेल. मविआचा करेक्ट कार्यक्रम झाला. हा निकाल मविआसह राजकीय विश्लेषकांचे अंदाज चुकविणारा ठरला. हा निकाल धक्कादायक, अनपेक्षित, अनाकलनीय, जनसामान्यांच्या मनात निकालाविषयी शंका असल्याच्या भावना विरोधकांनी व्यक्त केल्या.


मतदारांना मिळालेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभाचा हा कौल आहे. प्रत्यक्ष लाभामध्ये आर्थिक मदत देणाऱ्या योजना तर अप्रत्यक्ष लाभांमध्ये विकासाच्या योजना राबविल्याने मोठा विजय झाला. मतदानाची टक्केवारी वाढल्यानंतरच लाडकी बहीण योजना निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट झाले होते. देवाभाऊ लाडक्या बहिणींना आकर्षित करण्यात यशस्वी ठरले. शिंदे सरकारने केलेल्या विकास कामांच्या जाहिराती जनतेपर्यंत पोहोचल्यात. सरकार आपल्या दारी राबविले. हिंदुत्व, महागाई, बेरोजगारी, बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है, मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिक योजना, पक्ष फुट, पेन्शन इत्यादी प्रमुख मुद्दे निवडणुकीत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक है तो सेफ है' या नाऱ्याने हिंदू मतांचे विभाजन टळले. विशेष म्हणजे तरुण मतदार प्रभावित झालेत. हिंदूंच्या राजकीय एकजुटीचा हा विजय ठरला. व्होट जिहाद मात्र प्रभावी ठरला नाही. मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न झाला, मात्र तो यशस्वी ठरला नाही. बेरोजगारी, बिघडलेली कायदा व सुव्यवस्था, महिला अत्याचार, पेन्शन अशा काही मविआने उपस्थित केलेल्या प्रश्नांकडे मतदारांनी दुर्लक्ष केले. विदर्भ (६२), मराठवाडा (४६), उत्तर महाराष्ट्र (४७), पश्चिम महाराष्ट्र (५८), कोकण (३९) व मुंबई (३६) या सहाही विभागात भाजपासह सेना व राष्ट्रवादीला मोठे यश मिळाले. विदर्भ आणि मराठवाड्यात भाजपाला ही निवडणूक अडचणीची जाईल असे अंदाज बांधले गेले होते. मात्र सर्वच विभागात महायुतीने मोठी मुसंडी मारल्याने मोठा विजय झाला. मनोज जरांगे यांनी उघडपणे देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. मात्र निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात मराठ्यांनी आपापली भूमिका स्वतंत्रपणे घेण्याच्या सूचना जरांगेंनी दिल्या होत्या. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठ्यांना दिलेले स्वतंत्र आरक्षण भाजपाच्या पथ्यावर पडले.

लोकसभेची निवडणुक वगळता देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवारांना शह दिला. फडणवीस विरुद्ध शरद पवार अशी झालेल्या या विधानसभा निवडणूकीत फडणवीसांची रणनीती यशस्वी ठरली. विधानसभेतील विरोधी पक्षाचा दर्जा मिळण्यासाठी २९ आमदारांची गरज असते. मात्र मविआतील कोणत्याही एका पक्षाकडे २९ आमदार नसल्याने अधिकृत विरोधी पक्ष राहणार नाही. विशेष म्हणजे मविआतील तीनही पक्षाचे राज्यसभा व विधानपरिषदेचे दरवाजेही बंद झालेत. त्रिशंकू निकाल आले असते तर महाराष्ट्रात पाच वर्षे राजकीय अस्थिरता असती. महायुतीच्या महाविजयाने महाराष्ट्राला स्थिर सरकार मिळाले. ज्याप्रमाणे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाटेत दिग्गज नेत्यांचा पराभव झाला, त्याचप्रमाणे मोदी-शहा-फडणवीस लाटेत मविआतील दिग्गजांचा पराभव झाला. मविआला लोकसभेत मिळालेली सहानुभूती विधानसभेत दिसली नाही. हिंदुत्वाचे राजकारण करतांना भाजपाने राष्ट्रवादीचे नवाब मलिक यांच्या उमेदवारीला विरोध केला, इतकेच नव्हे तर त्यांचा प्रचार करणार नाही असे जाहीर केले होते. त्यामुळे मलिकांचा पराभव झाला मात्र हिंदुत्व प्रभावी ठरले.

सहाही पक्षासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असल्याने साम-दाम-दंड-भेद या मार्गाचा वापर झाला. महायुतीत जागावाटपाच्या वेळी झालेली ताणाताण प्रचारात दिसला नाही. प्रचाराची एक दिशा होती, विशेषता फेक नरेटिव्ह प्रभावी ठरणार नाही ही काळजी घेतल्या गेली. भाजपाच्या नेतृत्वात केंद्रात सरकार असल्याने महाराष्ट्रातही भाजपाच्या नेतृत्वात सरकार असावे जेणेकरून विकास करता येईल, लाभाच्या योजना सुरू ठेवता येईल हे नरेटिव्ह प्रभावी ठरले. जातीय समीकरणांची बांधणी केल्या गेली. भाजपाने पक्षाच्या जागांसह शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या जागांवरही लक्ष केंद्रित केले. भाजपा व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये समन्वय तर होताच. सोबतीला अजितदादांच्या राष्ट्रवादीतील कार्यकर्त्यांनीही जुळवून घेतले. परिणामी कार्यकर्त्यांची एकजुट दिसली. महत्त्वाचे म्हणजे महायुतीत तीन पक्ष असले तरी प्रचारावर नियंत्रण फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपाचे होते. शिवसेनेच्या पारंपारिक मतदारांना सोबत ठेवण्यासाठी भाजपाने सुद्धा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंना प्रचाराच्या केंद्रस्थानी ठेवले. काँग्रेस पक्ष बाळासाहेबांना स्वीकारतील का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. या घवघवीत विजयाने महायुतीतील शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हेच खरे पक्ष आहेत यावर शिक्कामोर्तब करण्यात भाजपाला यश आले. विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्ही मिळून दोनशेच्यावर जागा निवडून आणू, अन्यथा शेती करू असा जो दावा केला होता तो पूर्ण केला.

असो, भाजपाला स्पष्ट बहुमताकरिता फक्त तेरा जागा कमी असल्याने शिवसेना व राष्ट्रवादीचा सरकारमधील दबाव कमी राहील हे मात्र खरे.

### वर्तमान




श्याम ठाणेदार
9922546295


## अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय...

अभूतपूर्व, अनाकलनीय, अविश्वसनीय या तीन शब्दात पंधराव्या विधानसभेच्या निकालाचे वर्णन करावे लागेल. अभूतपूर्व म्हणजे या पूर्वी कधीही घडले नाही असे. हो हा निकाल अभूतपूर्व असाच आहे कारण यापूर्वी असा निकाल महाराष्ट्राने कधीही पाहिला नव्हता. २०१४ च्या मोदी लाटेतही जे घडले नव्हते ते आता घडले. महायुतीने तब्बल दोनशेच्या वर जागा जिंकत महाविकास आघाडीचा सुफडा साफ केला. महाराष्ट्रात महायुतीची लाट नव्हे तर त्सुनामी आली. या त्सुनामीत महाविकास आघाडीचे अनेक गड उध्वस्त झाले. महाविकास आघाडीच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभव पत्करावा लागला. ही त्सुनामी इतकी जबरदस्त होती की पाच महिन्यांपूर्वी जी महाविकास आघाडी अजिंक्य वाटत होती तिला अर्धशतक देखील गाठता आले नाही. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच विधानसभेला विरोधीपक्ष नेता देखील मिळणार नाही अशी अवस्था झाली. हे खरोखरच अभूतपूर्व असेच आहे.

अनाकलनीय या अर्थाने की असा निकाल लागेल असा अंदाज कोणालाच आला नव्हता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील राजकीय धुरिणांना असा निकाल लागेल असे वाटले नव्हते. खुद्द भाजप आणि महायुतीच्या नेत्यांना देखील हा इतका विराट मिळेल असे वाटले नसेल. भल्या भल्यांना विचार आणि अभ्यास करायला लावणारा असा हा निकाल आहे. महायुतीला या निवडणुकीत महाविकास आघाडीपेक्षा थोड्याफार जागा अधिक मिळतील असा अंदाज होता. महायुती कसाबसा सत्तेचा सोपान चढेल असा अंदाज होता निवडणूक पूर्व चाचणीत ही तेच दाखवण्यात आले होते मात्र प्रत्यक्षात त्याहूनही खूप वेगळे घडले.

अविश्वसनीय या अर्थाने की या निकालावर विश्वास ठेवणे अनेकांना अजूनही कठीण जात आहे. काहीजण या निकालावर अजूनही विश्वास ठेवायला तयार नाही कारण अवघ्या पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पूर्णपणे वेगळे चित्र पाहायला मिळाले होते. महाविकास आघाडीने आश्चर्यजनक कामगिरी करत लोकसभेच्या ३० जागा जिंकत महायुतीला नामोहरण केले होते. अवघ्या पाच महिन्यात अशी काय जादूची कांडी फिरली की ज्याने इतका मोठा उलटफेर केला? लोकसभेप्रमाणेच विधान सभेतही महाविकास आघाडीची सरशी होईल असा कयास काहीजण लावत होते त्यामुळेच या निकालावर त्यांचा विश्वास बसत नाही अर्थात कोणाचा विश्वास बसो अगर न बसो जनतेने दिलेला हा निकाल राजकीय पक्षांसह सगळ्यांना स्वीकारावाच लागणार आहे. हा जनतेच्या न्यायालयाने दिलेला निकाल आहे तो स्वीकारूनच विरोधी पक्षांनी या निकालाचे आत्मचिंतन करायला हवे.


या निकालाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की लोकसभा निवडणुकीत झालेल्या पिछेहाटीनंतर महायुतीने त्या निकालाचे आत्मपरीक्षण करून त्यातील चुका आणि उणीवा दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीने सामूहिक प्रयत्न केला त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची नेहमीप्रमाणे साथ लाभली. लोकसभेच्या निवडणुकीनंतर भाजपच्या दिल्लीतील नेत्यांनी छोट्या मोठ्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचाराचे अतिशय सूक्ष्म व काटेकोर नियोजन केले. याउलट महाविकास आघाडी लोकसभेच्या यशाने हुरळून गेली. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही आपल्याला सहानुभूती मिळेल या भ्रमात महाविकास आघाडीचे नेते राहिले त्यामुळे त्यांच्यात कोणताही समन्वय नव्हता. जागा वाटप असोत की प्रचार सभा महाविकास आघाडीची एकजूट कोठेच दिसली नाही. महाविकास आघाडीचे नेते सत्ता आपल्यालाच मिळाली या थाटात एकमेकांशी भांडू लागले. मुख्यमंत्रीपदावरून महाविकास आघाडीत रस्सीखेच सुरू झाली. महाविकास आघाडीतील बाष्कळ नेत्यांनी जी बोल बच्चनगिरी केली ती ही त्यांना नडली.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पिछेहाटीनंतर महायुती खडबडून जागी झाली आणि महायुती सरकारने अनेक लोकाभिमुख योजना आणल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही त्यापैकीच एक योजना. या योजनेअंतर्गत १५०० रुपये महिलांच्या खात्यावर जमा होऊ लागले. ही योजना महायुतीसाठी गेम चेंजर ठरेल असा अंदाज होता आणि तो खरा ठरला. यावेळी महिला मतदार मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडल्या. महिला मतदारांची टक्केवारी पाच टक्क्यांनी वाढली. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पदरात भरभरून मतांचे दान टाकले कदाचित त्यामुळेच महायुतीला इतका विराट विजय मिळवता आला. ज्यावेळी ही योजना आली त्यावेळी विरोधी पक्षांनी या योजनेवर टीका केली. ही टीका कदाचित महिला मतदारांना रुचली नसावी. राज्यातील महिला मतदारांनी महायुतीला तारलेच नाही तर अक्षरशः उचलून धरले या सर्वांचा परिपाक म्हणजे महायुतीला मिळालेले हे घवघवीत यश.

या निकालाने काँगेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि ठाकरेंच्या शिवसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तिन्ही पक्षांना मतदारांनी नाकारून भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यावर विश्वास दाखवला आहे त्यामुळे या तिन्ही पक्षांना आता पुन्हा शून्यातून सुरुवात करावी लागेल. अर्थात एका पराभवाने कोणताही पक्ष संपत नसतो. झालेल्या चुका दुरुस्त करून या पक्षाने २०२९ चे लक्ष्य समोर ठेवून पक्षाची बांधणी करावी लागेल. पक्षातील जुन्या बोल बच्चन नेत्यांना बाजूला सारून नव्या दमाचे कार्यकर्ते तयार करावे लागतील.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत त्यावर लक्ष केंद्रित करून या पक्षांनी तयारी सुरू करावी तर महायुतीने जनतेने दिलेल्या अभूतपूर्व यशाचा आदर राखत जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करून महाराष्ट्राला देशातील नंबर १ चे राज्य बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

### मनाचिये गुंती




वैशाली पाटील
9420350171


## वेश्या: कटू वास्तव...

वेश्या, हा शब्दच ऐकला तरी समाजात एक अवमानकारक भावना उमटते. आपण या विषयावर बोलणं, चर्चा करणं टाळतो. कारण ती समाजाचे नैतिक अधःपतन करते. तिच्यामार्फत कुटुंब व्यवस्था, तरुणपिढी उद्ध्वस्त होते. खरंतर या स्त्रिया अगदी इतिहास काळापासून आहेत. यांचा स्वतःचा असा एक वेगळा समाज होता. पूर्वी राजे एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करीत असत. त्यांच्या सतत होत असलेल्या लढाया, कुटुंबातील/भाऊबंदकीमधील कलह इत्यादी कारणांमुळे हे पुरूष अशा वेश्यांकडे जाऊन आपली मानसिक स्थिती उत्तम करून घेत असत. काळानुसार सुधारणा झाली आणि पुरुष एक पत्नी स्वीकारून सामाजिक नैतिक बंधन मानू लागला. मात्र या स्त्रिया समाजाच्या एका कोपऱ्यात, अनुत्तरित प्रश्नांची छाया घेऊन उभ्या अजूनही आहेत. त्यांची गरज संपली आहे असे मुळीच नाही. अजूनही एक ठराविक पुरुष वर्ग यांच्या आधीन आहेच. मात्र या स्त्रियांच्या जीवनातली वेदना, अपमान, आणि संघर्ष समाजात कधीच पूर्णपणे समजला जात नाही. समाजाने ते मान्य केले नाही. समाजाने त्यांना फक्त उपभोगापुरते मानले आणि दूर केले.

बहुतेक वेळा हे महिलांचे जीवन एक प्रकारच्या जबरदस्तीनेच सुरू होते. काहीजणींना गरिबी, बेरोजगारी आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यामुळे या व्यवसायात ढकललं जातं, तर काही जणींना फसवून किंवा जबरदस्तीने यात आणलं जातं. याचं खरं दुःख म्हणजे, एकदा या दलदलीत पडल्यावर परतणं जवळपास अशक्य असतं. त्यांना समाजानं 'वेश्या' म्हणून ओळखणं सोपं जातं, पण त्यांच्या मागे असलेल्या असंख्य वेदना कोणी जाणून घ्यायचं आव्हान घेत नाही. वेश्या हा व्यवसाय अनेकांसाठी अपमानास्पद आहे, पण त्या व्यवसायामागे लपलेल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी केलेल्या प्रयत्नांची खरी दास्तान फार कमी जणांनाच कळते. अनेक स्त्रिया या जगण्याच्या गरजेतून, समाजाच्या मानसिकतेला तोंड देत या व्यवसायात गुरफटतात. समाजाने त्यांना दुसऱ्या कोणत्या तरी मार्गावर जायला मदत केली असती तर त्यांच्या जीवनाची दिशा कदाचित वेगळी असली असती. समाजाचं हे नैतिक बंधन की, 'वेश्या' शब्दाचा उल्लेख करताच एकगट त्या स्त्रियांना वाईट, अपवित्र मानतो. पण त्यांच्या परिस्थितीचं मूळ हे समाजात, शासनाच्या अपयशात, आणि असमानतेच्या रचनेत आहे. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. काही प्रमाणात एनजीओ आणि सामाजिक संस्था त्यांच्यासाठी काम करत असल्या तरी, एक व्यापक योजना आणि समर्थन यांची आवश्यकता आहे.

वेश्यांच्या आयुष्यातले अनेक अश्रू हे कधीच ओघळत नाहीत; ते हृदयातच गोठलेले असतात. त्यामुळे आपल्याला त्यांच्या प्रति सहानुभूती, आदर, आणि माणुसकीने वागणं महत्त्वाचं आहे. त्यांनी निवडलेला मार्ग हा त्यांचा नाही, पण त्यांना त्यातच आयुष्य घालवावं लागतं. त्यांच्या जीवनाला एक नवा धागा देणं, त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करणं ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.

शेवटी, या स्त्रियाही माणूसच आहेत, त्यांच्या भावनांनाही मान द्यायला हवा. त्यांच्या जीवनातील संघर्ष, वेदना, आणि अपेक्षांना आपण समजून घेतलं पाहिजे, कारण तेही एक माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क धरून आहेत.

समाजाचे नैतिक नुकसान होत असेल हे मान्य केले तरी याच समाजाने जर त्यांचे पुनर्वसन केले, त्यांच्या गरजा पूर्ण केल्या, त्यांची जबाबदारी स्वीकारली तर त्यांनासुध्दा समाजात मुक्त वावर करता येईल. आणि त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. त्यांना सन्मानाने जगता येईल.

### वाचक विचार मंच

## पुन्हा एकदा ईव्हीएमवर शंका उपस्थित



नुकताच १५ व्या विधानसभेचा निकाल लागला. यामध्ये महायुतीला पूर्ण बहुमत प्राप्त झाले तर महाविकास आघाडीतील कोणत्याही एका पक्षाला विरोधीपक्ष म्हणून देखिल बसण्याची संधी मिळालेली नाही. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे त्यामुळे विरोधी पक्षांकडून पुन्हा एकदा ईव्हीएम तथा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनवर शंका उपस्थित केली जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पीएम मोदींनी दिल्लीत जंगी सेलिब्रेशन केले. महाराष्ट्राच्या विजयाने सर्व रेकॉर्ड मोडले असून गेल्या ५० वर्षातील सर्वात मोठा विजय असल्याचे नमूद केले आहे. तर महायुतीतील नेते लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरल्याचे म्हणत असून लोकसभेतील दुरुस्ती करुन विधानसभेला आम्हाला जिंकता आल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत. विरोधीपक्ष म्हणून देखील बसण्याची संधी न मिळणे एवढी महाविकास आघाडीवर नाराजी आहे काय ? माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हा निकाल पूर्णपणे अनपेक्षित आणि अनाकलनीय असल्याचे म्हटले आहे. देशातील विविध राज्यांतील पोटनिवडणुकांचा निकाल पाहिला तर भाजपा सोडून वेगळ्या पक्षांना संधी मिळते मात्र सार्वत्रिक निवडणुकीत भाजपा, भाजपपुरस्कृत यांच्या बाजूने निकाल येतो, याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे असल्याचे जनतेतून बोलले जात आहे.

**राजू जाधव**
मांगूर जि. बेळगांव

### धुमस

## वनवास

विधानसभेच्या निवडणुकीत
महाराष्ट्रात त्सुनामी आली
संकटकाळात महायुतीच्या
लाडकी बहीण कामी आली

'मशाल' विझली
मोडून पडला 'हात'
'तुतारी' फुंकणाऱ्याने
लढाईत सोडली साथ

'परिवारा' ने 'कमळा' ची बाग
फुलवली एक 'संघ' राहून
'घड्याळा'ने गजर केला
सर्वत्र 'गुलाबी' रंग पाहून

'सायकल' पंचर झाली
'इंजीन' सुध्दा कोसळले
सर्वच 'वंचित' राहिल्याने
सत्तेचे स्वप्न धुळीत मिसळले

'धनुष्यबाणा'ने घेतला
एकदम अचूक वेध
विक्रमी ठरली घोडदौड
यशस्वी झाला अश्वमेध

'काका' आणि 'मातोश्रीं'ना
हुंदके आवरत म्हणाली 'आय'
आता पुढील पाच वर्ष
वनवास भोगणे हाच उपाय

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

### संवाद

## स्थानिक प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची गरज!


हिंदू धर्माच्या इतिहासात अत्यंत पवित्र मानली गेलेली गंगा नदी आणि तिच्या दोन उपनद्या वर्षानुवर्षे स्नानादी धार्मिक विधी पार पाडण्यासाठी वापरल्या गेल्यामुळे अत्यंत प्रदूषित झाल्या आहेत. गंगेत स्नान, दर्शन आणि धार्मिक विधी पार पाडण्यासाठी संपूर्ण भारतातून लाखो भाविक यात्रेकरू या नात्याने नदी किनारे आणि जवळच असलेली मंदिरे यांना भेटी देत असतात. या यात्रेकरूंना धार्मिक विधी पार पाडण्यासाठी वेगळ्या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने किनाऱ्याजवळचा परिसर अस्वच्छ आणि प्रदूषित होत असतो. त्यावर नियमित स्वच्छता राखण्याचे जरी प्रयत्न केले जात असले तरी वाढत्या संख्येने येणाऱ्या भक्तगण आणि पर्यटकांची वर्दळ यापुढे केलेले प्रयत्न अपुरे पडत असतात याची जाणीव त्या परिसराला भेट दिल्यावर होते. साहजिकच राष्ट्रीय हरित लवादाला गंगाकिनारी काशी ते वाराणसी परिसरात राहणाऱ्या सर्वसामान्य लोकांसाठी धोक्याच्या सूचना देणारे फलक लावण्याचे आदेश वाराणसी आणि नदी किनारच्या प्रशासनाला देणे भाग पडले. गंगा नदीचे पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचे हरित लवादाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक प्रशासनांना सांगितले आहे. नदी किनाराच्या भागांत राहणाऱ्या लोकांनी नदीचा वापर प्रामुख्याने पिण्यासाठी करण्यापेक्षा धार्मिक, विसर्जनादी विधी, सांडपाणी सोडण्यासाठी केला जात आहे. त्यात भर म्हणून नदी परिसरात वाढत गेलेल्या औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे भोवतालचे वातावरण प्रदूषित झाले आहे.

गेल्या काही वर्षांत गंगा नदीच्या स्वच्छतेसाठी अगोदर बऱ्याच घोषणा केल्या होत्या. त्यानंतर केन्द्र व राज्य सरकारांनी त्याकरिता हजारो कोटी रुपयांची तरतूद केली. आणि गंगा नदीच्या स्वच्छतेचे प्रयत्न केले जात आहेत. तरीही नदी स्वच्छ करण्याची मोहीम काही यशस्वी होत असल्याचे दिसून येत नाही. नदीच्या प्रदूषणात वाढ होण्यास जवळपासच्या परिसरातील उद्योगधंदे व शहरांचा विस्तार, बांधकामे मुख्यत्वे कारणीभूत असली तरी स्नानादी धार्मिक विधींमुळे गंगा नदी अस्वच्छ आणि प्रदूषित होत आहे असे लोकांच्या मनावर बिंबविले जात आहे. तसे पाहता नदी परिसरात स्वच्छता राखण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपायांमध्ये काही त्रुटी राहून गेल्याचे आढळल्यास त्यावर दुरुस्तीच्या उपाय योजना आखणे आवश्यक असते. परंतु त्याबाबतीत काहीच वाच्यता केली जात नाही परिणामी लोकांच्या मनात अधिक संभ्रम निर्माण होतो.

राष्ट्रीय हरित लवादाच्या सूचना पळतांना नदीच्या पाण्यात माणसांच्या अनास्थेव्यतिरिक्त अन्य काही कारणे असतील तर त्यावर तातडीने कारवाई करण्याची स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे हे प्राधान्याने लक्षात घ्यायला हवे.

**राजन पांजरी**
जोगेश्वरी पूर्व, मुंबई
मो.नं.: ९८१९७००८१८

### गुल्लेर




नरेंद्र इंगळे
9561226572


## डिपॉजीट जप्त..

'ओ पांडू.. भाऊ कुठी आहेत? फोनही उचलत नाहीत.'

'भाऊचा पत्ता मलेही ठाऊक नाही.'

'असा कसा ठाऊक नाही? तू भाऊचा पीए आहेस ना? इलेक्शनात मोठा पुढे पुढे करत होता..'

'काय काम आहे भाऊसोबत?'

'माहे आठ दिवसाचे पैसे राह्यले.. खेड्यापाड्यात उपाशीतापाशी ॲटो फिरवला. आता भाऊ फोनही उचलत नाहीत.'

'भेटतीन तुहे पैसे.. भाऊसोबत गेम झाला.'

' मी पह्यलेच म्हनो निकालात लंबे होतात भाऊ.. डिपॉजीट जप्त होते. बेपक्ष निवडून येत असते काय?'

'असं नका म्हनू.. भाऊले राग येईन.'

'मी तुह्याजवळ बोलून राह्यलो.. त्या हाटेलवाल्याचे पैसे राह्यले.. बारवाला दोन दिवसापासून फोन करून राह्यला.. बॅनरवाला भाऊलेच पाहून राह्यला.. भाऊनं फोन बंद करून ठेवला.'

'भाऊ धुंदीत असतीन.'

'म्हनजे?'

'भाऊनं उतारा काढला. एका मयन्यापासून फिरनं सुरुच आहे.. जराशीक घेतली अन् झोपले असतीन कुठीतरी.'

'कालपासून झोपलेच आहेत काय? 'पंचवीस खेप फोन लावला.. आऊट ऑफ कव्हरेज दाखून राह्यला.'

'मंग भाऊ रेंजच्या बाहीर असतीन.'

'कुठी असू द्या पन आमचे पैसे तेवढे काढून द्या.'

'भरोसा नाही काय तुमाले? भाऊ कोनाचे पैसे डुबोत नाहीत.'

'मले अर्जंट पैशाचं काम आहे.. सध्याचे तुमच्याजवळचे द्या.'

' माह्याजवळ भाऊनं खजिना जमा करून ठेवला काय? उलट इलेक्शनात मलेच गपकनी बसली. माहेच वीस हजार भाऊजवळून घेनं आहेत.'

'असा कसा पीए आहेस बे तू? पीएनं सगळा हिसोब क्लीअर ठेवला पाहिजे.'

'हिसोब पाठच आहे.. फक्त भाऊले रिचेबल होऊ द्या.. नाही म्हनता भाऊचे पंचवीस लाख खर्च झाले इलेक्शनात.'

'नगदी की उधारीत? मले समजलं.. भाऊ चाटा माराले वस्ताद आहे.. लय लोकाईचे पैसे डुबोले. अशी नियत असली तर कसा निवडून येईल भाऊ?'

# सामान्य नागरिक म्हणून जगणं आनंददायी

## माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांचे मत

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** भारताचे ५० वे सरन्यायाधिश धनंजय चंद्रचूड यांचा ८ नोव्हेंबरला न्यायालयीन कामकाजाचा शेवटचा दिवस होता. यानंतर सेवा ज्येष्ठतेनुसार संजीव खन्ना यांनी ५१ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला. निवृत्तीनंतर एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना चंद्रचूड म्हणाले, सामान्य नागरिक म्हणून जगण हे अधिक आनंददायी आहे.



निवृत्तीनंतरच्या आयुष्यावर माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना म्हणाले, 'न्यायालयीन कार्यालयातील बंधने आणि जबाबदाऱ्यांनी बांधलेले असण्यापेक्षा सामान्य नागरिक म्हणून जगणं हे अधिक आनंददायी' असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# निकालावर आमचा विश्वास नाही – रमेश चेन्नीथला

वृत्तसंस्था

**मुंबई :** राज्यातील काँग्रेसच्या १०० टक्के जिंकून येणाऱ्या उमेदवारांचा पराभव कसा होऊ शकतो? असा प्रश्न काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चन्नीथला यांनी उपस्थित केला आहे. महाराष्ट्राच्या जनतेवर आमच्या विश्वास आहे. त्यामुळे या निकालावर आमचा विश्वास नसल्याचे त्यांनी त्यांनी म्हटलेआहे. हा निकाल अनपेक्षित आहे. कुणालाच त्यावर विश्वास बसत नसल्याचा दावा देखील त्यांनी केला.



काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा पराभव झाला, आमचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा देखील पराभव झाला. त्यामुळे या निकालावर आम्ही अभ्यास करून नंतर जनतेसमोर जाणार असल्याचे चेन्नीथला यांनी म्हटले आहे.

# तब्बल ३६२ कोटींच्या हिऱ्याची लिलावात विक्री

वृत्तसंस्था

**जीनिव्हा :** जगभरात अनेक सुंदर व अनोखे हिरे आहेत. अर्थातच त्यांची किंमत कोट्यवधी रुपयांची असते. गुलाबी रंगाचे हिरे दुर्मीळ असतात व त्यामुळे त्यांना किंमतही मोठीच मिळते. अशाच एका हिऱ्याची अवघ्या पाचच मिनिटांत एका लिलावामध्ये विक्री होऊन त्याला तब्बल ३६२ कोटी रुपयांची किंमत मिळाली होती.

### गुलाबी रंगाचा दुर्मीळ हिरा

हा हिरा जगातील सर्वात दुर्मीळ हिऱ्यांपैकी एक आहे. स्वीत्झर्लंडमध्ये २०१८ मध्ये झालेल्या लिलावामध्ये १९ कॅरेटचा हा दुर्मीळ गुलाबी हिरा तब्बल ३६२ कोटी रुपयांना (७० मिलीयन डॉलर) विकला गेला. अमेरिकेचे हिरे व्यावसायिक हॅरी विन्स्टन यांनी जीनिव्हामध्ये झालेल्या एका लिलावात हा हिरा खरेदी केला.



**सावंतवाडी :** सावंतवाडी विधानसभा मतदार संघात विद्यमान आमदार, राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा सलग चौथ्यावेळी भरघोस मतांनी विजय झाला. विजयानंतर शिवसेना, भाजपा कार्यकर्त्यांनी केसरकर यांच्या विजयाचा गुलाल उधळत महायुतीचा विजय साजरा केला.

# अर्जेंटिनामध्ये आहे तरंगणारे गोलाकार बेट!

## दलदलयुक्त डेल्टामधील हे एक निर्जन बेट

**लंडन :** जगभरात अनेक अनोखी बेटं पाहायला मिळतात. भारतात हिमाचल प्रदेशातील




मंडी जिल्ह्यात असणाऱ्या पराशर सरोवरातही एक अनोखे बेट आहे. हे गोलाकार बेट संपूर्ण सरोवरात तरंगत फिरत असते. असेच एक तरंगणारे व गोलाकार बेट अर्जेंटिनामध्येही आहे. त्याचे नाव ठएल ओजो' असे आहे. अर्जेंटिनाच्या दलदलयुक्त डेल्टामधील हे एक निर्जन बेट आहे. पराशर सरोवरातील बेटाप्रमाणेच हे गोलाकार व तरंगणारे बेट आहे. आकाशातून पाहिल्यावर ते एखाद्या डोळ्यासारखे दिसते.

# आजीबाईंनी केला पुश-अप्सचा विक्रम

**टोरांटो :** चांगल्या आरोग्यासाठी नियमित व्यायम करणे महत्त्वाचे असते. परंतु चाळीशीनंतर चालणे, वॉर्म अप, योगासन असा व्यायाम अनेक जण करतात. परंतु वयाच्या साठीत कुणी १,५७५ पुश-अप्स तासाभरात काढू शकतो का? परंतु कॅनडामधील ५९ वर्षीय डोनाजीन वाइल्ड यांनी हा विक्रम केला आहे. त्यांचे वय केवळ संख्येने वाढले आहे. परंतु त्यांचे शरीर युवकांना मागे टाकणारे आहे.

### ५९ वर्षी गिनीज वर्ल्ड रिकॉर्ड्समध्ये नाव



डोनाजीन यांनी आजी होण्याच्या वयात गिनीज वर्ल्ड रिकॉर्ड्समध्ये नाव नोंदवले आहे. त्यांनी तासाभरात १,५७५ पुश-अप करण्याचा विक्रम केला आहे.



## दिल्ली प्रदूषण नियंत्रण समितीचा मोठा निर्णय

# कंपन्यांची ड्रोनद्वारे होणार तपासणी

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** राष्ट्रीय राजधानीच्या निवासी भागात बेकायदेशीरपणे चालणारे जीन्स डाईंग कारखाने, रेडी-मिक्स काँक्रिट प्लांट आणि इलेक्ट्रोप्लेटिंग युनिट्स यांना लक्ष्य करण्यात येणार असून दिल्ली प्रदूषण नियंत्रण समिती बेकायदेशीर कारखाने आणि युनिट्सबाबत ड्रोन सर्वेक्षण करण्याच्या तयारीत आहे. औद्योगिक प्रदूषण करणाऱ्या युनिटची ओळख पटल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करून ती लवकरच बंद करण्यात येणार आहेत.

हे सर्वेक्षण तुखमीरपूर, करावल नगर, गोकुळपुरी, गाझीपूर, अली विहार आणि मिठापूर आणि त्यांच्या आजूबाजूच्या १७ प्रमुख प्रदूषणाच्या ठिकाणांमध्ये केले जाईल. येथे बेकायदेशीर डाईंग युनिट्स आणि जीन्स वॉशिंग युनिट्स कार्यरत आहेत. सध्या १५ दिवस पायलट प्रोजेक्ट म्हणून सर्वेक्षण केले जाणार आहे. यामध्ये ड्रोन आधारित ऑर्थो-रेक्टिफाइड इमेजरी वापरण्यात येणार आहे. ते प्रदूषण करणाऱ्या युनिटच्या उंचीवरून छायाचित्रे घेईल. दिल्ली गेल्या १० ते १५ वर्षांपासून तीव्र वायू आणि जल प्रदूषणाशी झुंजत आहे.

## डीपीसीसीने यासाठी निविदा काढली !

तपासी कार्यामध्ये ड्रोन सुमारे ४५-६० मिनिटांच्या कालावधीसाठी उड्डाण करेल. त्याची दृश्यमानता ३-५ किमी असेल आणि ती ७५० फूट उंचीवर पोहोचेल. यामध्ये १७ ड्रोन वापरण्यात येणार आहेत. छुप्या पद्धतीने चालणाऱ्या बेकायदेशीर औद्योगिक युनिट्समधून होणाऱ्या प्रदूषणामुळे हवा आणि पाण्याची गुणवत्ता ढासळण्यास मोठा हातभार लागला आहे. डीपीसीसीने यासाठी निविदा काढली आहे. याअंतर्गत इच्छुक एजन्सींनी त्यांच्या प्रस्तावात ड्रोन आराखडा, मसुदा स्क्रिप्ट, कृती आराखडा, प्रारूप आराखडा विहित मुदतीत सादर करायचा आहे. त्याचबरोबर ड्रोनद्वारे गोळा केलेली छायाचित्रे आणि डेटा डीपीसीसीला ऑनलाइन द्यावा लागेल.

# महाराष्ट्र–झारखंड मतमोजणीची एलन मस्क यांनी दखल घेतली!

वृत्तसंस्था

**न्यूयॉर्क :** भारतात झारखंड आणि महराष्ट्र विधानसभेसाठीची मतमोजणी शनिवार (दि. २४) पार पडली. यासाठीचे झारखंडमध्ये २ टप्प्यात, तर महाराष्ट्रात एकाच टप्प्यात निवडणुक मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानंतर अवघ्या तीन दिवसानंतर मतमोजणी प्रक्रिया पार पडली. दरम्यान जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांनी महाराष्ट्र, झारखंड मतमोजणीची दखल घेतली. या संदर्भात त्यांनी "एक्स पोस्ट केली आहे. (टेस्ला) आणि (स्पेसएक्स) चे सीईओ एलन मस्क यांनी भारतातील मतमोजणीवर एक्स पोस्ट केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, 'भारताने १ दिवसात ६४ कोटी (६४० दशलक्ष) मतांची मोजणी केली, कॅलिफोर्नियाची निवडणुक होऊन १९ दिवस झाले तरी निकाल अद्याप प्रलंबित असल्याचे मस्क यांनी म्हटले आहे.



मतदानाच्या १९ दिवसांनंतरही कॅलिफोर्नियाने अधिकृतपणे अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीचे निकाल जाहीर केले नाहीत. त्यामुळे अब्जाधीश उद्योगपती एलन मस्क यांनी या प्रक्रियेवर जोरदार टीका केली. तसेच लोकसभा निवडणुकीदरम्यान भारताने यशस्वीरित्या पार पाडलेल्या प्रचंड मतदान प्रक्रियेची तुलना केली. मस्क यांनी निदर्शनास आणून दिले की, भारताने केवळ एका दिवसात ६४ कोटी मतांची मोजणी केली, तर यूएस राज्यात अजूनही मतमोजणी सुरू आहे.

## पुतिन यांची पाश्चात्य देशाना हल्ल्याची धमकी

**मॉस्को :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी आता अमेरिका आणि ब्रिटनच्या लष्करी सुविधांना लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. युक्रेनने रशियावर अमेरिकन आणि ब्रिटिश क्षेपणास्त्रे डागल्यानंतर रशियन राष्ट्राध्यक्षांची धमकी आली आहे. त्यांच्या दूरचित्रवाणी भाषणात पुतिन यांनी पाश्चात्य देशांवर थेट हल्ले करण्याची धमकी दिली. पुतिन म्हणाले की त्यांच्या देशाने नुकतीच युक्रेनवर केलेल्या हल्ल्यात नवीन आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी केली आहे. मात्र, त्यांनी ज्या देशांना इशारा दिला आहे त्या देशांचे थेट नाव घेतले नाही. ते म्हणाले, रशियाविरूद्ध शस्त्रे वापरण्याची परवानगी देणाऱ्या देशांच्या लष्करी सुविधांविरूद्ध शस्त्रे वापरण्याचा रशियाला अधिकार असल्याचे आम्ही मानतो.

# चीनमध्ये सापडला सोन्याचा सर्वात मोठा खजिना !

वृत्तसंस्था

**बीजिंग :** चीनमध्ये सोन्याचा मोठा साठा सापडला आहे. हुनान प्रांताच्या मध्यवर्ती भागात त्यांना हे सोन्याचे भांडार सापडले आहे. हुनान प्रांताच्या भूगर्भशास्त्र ब्युरोने याबाबतची माहिती दिली आहे. सुमारे ८२.८ अब्ज डॉलर किमतीचा हा साठा असल्याची शक्यता वर्तवली जाते आहे.

भारतीय चलनात त्याची किंमत ६९,३०,६२,३६,००,००० रुपयांपेक्षा जास्त आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा सोने उत्पादक देश आहे. जागतिक सुवर्ण परिषदेच्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये जागतिक सोन्याच्या उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १० टक्के



होता. दरम्यान, माध्यमांवर देण्यात आलेल्या एका निवेदनानुसार, भूवैज्ञानिकांनी वांगू सोन्याच्या भांडारामध्ये २,००० मीटर (६,५६१ फूट) पेक्षा जास्त खोलीवर सोन्याचे साठे आढळले आहेत. पिंगजियांग काउंटीमध्ये ४० हून अधिक ठिकाणे ओळखली गेली आहेत. प्राथमिक उत्खनन क्षेत्रात एकूण ३००.२ टन सोन्याचा साठा आढळून आला, ज्यामध्ये धातूचे सर्वाधिक प्रमाण १३८ ग्रॅम (४.९ औंस) प्रति टन इतके आहे.


# काश्मीरमध्ये बर्फवृष्टीमुळे तापमानात घट

## श्रीनगर व बडगाममध्ये पावसाच्या सरी

वृत्तसंस्था

**श्रीनगर :** पर्यटन स्थळ गुलमर्गसह काश्मीरच्या उंच भागात रविवारी नवीन हिमवृष्टी झाली, ज्यामुळे खोऱ्यात पावसाची आशा निर्माण झाली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुलमर्गमध्ये शनिवारी संध्याकाळपासून कुपवाडा जिल्ह्यातील माछिल आणि कर्नाह आणि बांदीपोरा जिल्ह्यातील तुलाईलमध्येही मध्यम हिमवृष्टी झाली.

श्रीनगर आणि बडगाम जिल्ह्याच्या काही भागांसह काश्मीरच्या मैदानी भागात रात्री हलका पाऊस झाला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, उंच भागात बर्फवृष्टीमुळे दिवसाचे तापमान घसरले



आहे. गेल्या आठवड्यात शून्याच्या खाली गेलेल्या किमान तापमानातही वाढ दिसून आली. श्रीनगर शहरात किमान तापमान ४.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे यावेळी सामान्य आहे. पहलगाम आणि गुलमर्ग येथेही शून्याखालील तापमान नोंदवले गेले, परंतु दोन्ही ठिकाणी किमान तापमान सामान्यपेक्षा किंचित जास्त होते. येत्या आठवडाभरात हवामान कोरडे राहील, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. हवामान खात्याने म्हटले आहे की, ५ डिसेंबरपर्यंत सामान्यतः कोरडे आणि थंड हवामान राहील. २३ नोव्हेंबरच्या रात्री उशिरा ते २४ नोव्हेंबरच्या सकाळपर्यंत उंच भागात हलका हिमवर्षाव किंवा हलका पाऊस अपेक्षित आहे आणि ३० नोव्हेंबरच्या रात्रीपासून १ डिसेंबरच्या सकाळपर्यंत आणखी एक हलका हिमवर्षाव शक्य आहे.

# ...तर आज महाराष्ट्रात वेगळं चित्र असत; संजय राऊतांची मनसेवर टीका

वृत्तसंस्था

**नवी मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेचा निकाल नुकताच लागला. या निकालात महायुतीला बहुमत मिळाले तर महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांचे उमेदवार विधानसभेच्या निवडणूक रिंगणात उतरवले होते. पण त्यांना या निवडणुकीत यश मिळाले नाही. जनतेने त्यांना जनादेश नाकारला. लोकसभेत राज ठाकरे यांनी भाजपाला जाहीर पाठिंबा दिला होता. तर यावेळी मनसेने अनेक ठिकाणी उमेदवार उभे केले. पण त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. त्यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही. त्यावर आता संजय राऊत यांनी तोंडसुख घेतले. राज ठाकरेंनी भाजपला मदत करण्याची भूमिका घेतली नसती तर आज चित्र वेगळे असते, असे ते म्हणाले.



# देशातील कोणतीही पोटनिवडणूक लढवणार नाही !

वृत्तसंस्था

**लखनौ :** यूपीच्या ९ जागांवर विधानसभा पोटनिवडणूक पूर्ण झाली आहे. पोटनिवडणुकीचे निकालही शनिवारी आले. पोटनिवडणुकीत भाजपने ६ जागा जिंकल्या आहेत. याशिवाय सपा दोन जागांवर तर आरएलडीने एका जागेवर विजय मिळवला आहे. पोटनिवडणुकीत एकही जागा न जिंकल्याने बसपा प्रमुख मायावती यांनी रविवारी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत मायावती यांनी निवडणुकीत बनावट मतदान होत असल्याचा आरोप करत देशात बनावट मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोगाने कठोर पावले उचलली नाही तर आमचा पक्ष यापुढे सक्षम होणार नाही, असे सांगितले. देशातील कोणतीही निवडणूक जिंकण्यासाठी पोटनिवडणूक लढवणार नाही.

### बसपा प्रमुख मायावती

बसपा प्रमुख मायावती म्हणाल्या, 'उत्तर प्रदेशात विधानसभेच्या ९ जागांवर झालेल्या पोटनिवडणुकीत यावेळी झालेल्या मतदानानंतर आणि काल आलेल्या निकालानंतर लोकांमध्ये अशी सामान्य चर्चा आहे की, देशात आधी निवडणुका जिंकल्या पाहिजेत. सत्तेचा गैरवापर करून मतपत्रिकेवर खोटी मते टाकली गेली आणि आता हे काम ईव्हीएमच्या माध्यमातून होत आहे, ही लोकशाहीसाठी अत्यंत खेदाची आणि चिंतेची बाब आहे.



## कामासाठी कार नेली परत केलीच नाही !

**फोंडा :** पालवाडा- उसगाव येथील राजू वागू कोकरे याच्या मालकीची होंडा सिटी कार घरगुती कार्यक्रमासाठी मागून नेलेल्या राजशेखर सी. व शोभराज राजशेखर (मूळ कर्नाटक) या पिता-पुत्राने परत न केल्यामुळे फोंडा पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. सदर कार दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी नेण्यात आली होती.

# काजूविक्रीच्या दुकानात चोरी, तिघांना अटक

## ३.५० लाखांपैकी २ लाख रूपये रोकड हस्तगत

**पणजी :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या टॅक्सी स्टँडजवळील काजूविक्रीच्या दुकानातून ३.५० लाख रूपयांची रक्कम चोरी केल्याप्रकरणी म्हापसा पोलिसांनी तिघांना अटक केली व त्यांच्याकडून चोरीतील २ लाख रूपये रक्कम जप्त केली. कालू राम (१९, रा. काणका व मूळ राजस्थान), जुहारा राम (२४, राजस्थान), व नारायणलाल चौधरी (३५, राजस्थान) अशी संशयितांची नावे असून कालू राम हा सदर दुकानात कामाला होता. कालू रामला म्हापसा पोलिसांनी तर जुहारा राम व नारायणलाल या दोघांना राजस्थान पोलिसांच्या सहाय्याने ताब्यात घेत अटक केली.



**इस्लामाबाद :** पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतातील कुर्रम येथील बागन बाजारमध्ये शिया आणि सुन्नी मुस्लिमांदरम्यान मोठ्या प्रमाणात हिंसा झाली आहे. दोन दिवसांच्या हिंसेत आतापर्यंत ४७ जणांचा मृत्यू झाला आहे. याचबरोबर शिया मुस्लिमांनी पाकिस्तानचा विशाल ध्वज उतरवून त्याजागी स्वतःचा ध्वज फडकविला आहे.

# मुंबई महापालिका कारवाईचा बडगा उगारणार !

वृत्तसंस्था

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबर रोजी पार पडले असून शनिवार, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीअंती निकाल जाहीर झाले आहे. आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर मुंबईत बानरवाजीला उत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यासंदर्भात न्यायालयाने दिलेले आदेश लक्षात घेऊन मुंबई महानगरपालिकेने बानरबाजीविरोधात कारवाईची विशेष मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिसांच्या बंदोबस्तात असे बॅनर हटविण्याचे आदेश प्रशासनाने २४ विभाग कार्यालयांना दिले आहेत.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता जारी होण्यापूर्वी राज्यात सर्वत्र बेकायदा फलकबाजीला उधाण येण्याची शक्यता लक्षात घेऊन घेऊन बेकायदा फलक हटवण्यासाठी सात ते १० दिवसांची विशेष मोहीम हाती घेण्याचे आणि बेकायदा फलक लावणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याचे आदेश राज्यातील सर्व महापालिका व नगर परिषदांना दिले होते.

## अनुज्ञापन विभागाने विभागाचे आदेश

विधानसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर बेकायदा फलकबाजीला पुन्हा एकदा उधाण येईल. त्यामुळे निकालानंतर बेकायदा फलकबाजी होता कामा नये, असा इशाराही मुख्य न्यायमूर्तींनी संबंधित यंत्रणांना दिला होता. विधानसभा निकाल जाहीर झाल्यानंतर मुंबईमध्ये निवडून येणाऱ्या आमदारांचे, राजकीय पक्षांचे अभिनंदन करणारे अथवा अन्य राजकीय फलकबाजी होण्याची शक्यता आहे.

### प्रतिक्षा आचारसंहिता संपण्याची



दरम्यान, फलक, बॅनर अथवा पोस्टरवर नेते, कार्यकर्त्यांचे नाव अथवा छायाचित्र असलेल्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ईव्हीएम'विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार

**विश्रांतवाडी - पुणे :** राज्यातील प्रतिष्ठित लढत समजल्या जाणाऱ्या वडगाव शेरी मतदार संघात धक्कादायक निकाल समोर आले आहेत. ५० हजारांहून अधिकची हक्काची मतं असूनदेखील तेवढीही मतं न मिळाल्याने ईव्हीएम यंत्रणेत घोळ असल्याचा आरोप वडगाव शेरी मतदार संघातील बहुजन समाज पक्षाचे उमेदवार आणि प्रदेश महासचिव, पश्चिम महाराष्ट्र प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी केला.

# एका विजयाने कोणी मोठा होत नाही

## राजेभाऊ फड — पक्षाचे काम जोमाने करणार



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची ताकद वाढवण्यासाठी जोमाने काम करणार असून देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या विचारांना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी ज्येष्ठांना आणि युवकांना सोबत घेऊन नव्याने संघटना वाढीसाठी रचनात्मक काम करण्यावर आम्ही भर देणार असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. पक्षाच्या बाजूने लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांसोबत हातात हात घालून काम करू तसेच पक्षाला कौल देणाऱ्या मतदारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघर्ष करीत राहणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघ हा राज्यातील सर्वाधिक लक्षवेधी असलेला मतदारसंघ आहे. येथील जनता शरदचंद्र पवार साहेबांच्या नेहमीच पाठीशी उभी टाकलेली आहे आणि त्यांच्या विचारांना मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणावर आहे. एका विजयाने कोणी मोठा होत नाही आणि एका पराभवाने कोणीही संपत नाही. विधानसभा निवडणुकीतील निकाल हा जरी धक्कादायक असला तरीही या निकालाचे अजिबात आश्चर्य नाही. लोकशाहीला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना मतदानाच्या दिवशी घडल्या. बोगसगिरीचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडले आहेत. त्यामुळे हा जनतेचा कौल आहे असं कसं म्हणता येईल? हा तर फक्त ईव्हीएमचा कौल आहे. पक्षाचे अध्यक्ष आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात आम्ही वाटचाल करणार असून नव्या जोमाने आम्ही काम करू, पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी रचनात्मक आखणी करू आणि ज्येष्ठांना व युवकांना सोबत घेऊन पक्षाचा विस्तार करू अशी प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी माध्यमांना दिली आहे.

# टक्केवारी आ.नमिता लोखंडेला पावली!

## चर्चा:जनतेचा रोष तरी जुमलेबाज विजयी कसा?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या नवनिर्वाचित आमदार नमीता लोखंडे यांचा मागिल पाच वर्षांत जेवढा विकास केला तेवढा विकास केलेल्या आमदारा नमीता लोखंडे यांच्या कामाला आला म्हणाव लागेल कारण आमदारा नमीता लोखंडे यांनी भरमसाठ भ्राष्ठचार करुन निधी गोळा केला पन तोच निधी तोच लाचलुचपत विकास निधी केज अंबाजोगाई मतदार संघात एका रात्रीत घराघरात पोहोचला आहे त्यामुळे आमदारा नमीताताई यांनी असा विकास निधी खुप अफाट मेहनत घेऊन उपलब्ध केला आहे रोडच्या कामाचे उद्घाटन केल्यानंतर उद्घाटनाची पाटी सुध्दा त्या उद्घाटनाच्या ठिकाणी राहत नव्हती एवढ्या मेहनतीने आमदारा नमीताताई यांनी मागील पाच वर्षात विकास केला तसेच टक्केवारी खाऊन एवढ्या मोठ्या प्रमाणात मतदार संघाचे नुकसान करुन भरमसाठ निधी मतदार संघाच्या विकासाठी निधी आणला व तोच निधी मतदार संघाच्या विकास करण्यासाठी नव्हे तर तोच निधी घराघरात पोहोचेल म्हणून व आमदारा नमीताताई यांनी तो निधी परत आमदारा होण्यासाठी आणला होता त्यामुळे आमदारा नमीताताई यांच्या कामाला तो निधी आला आहे त्यामुळे आमदारा नमीताताई आमदारा झाल्या आहेत त्यामुळे त्यामुळे त्यांचे केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातुन अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# आधार मल्टीस्टेटला सदिच्छा भेट!

## ऋणानुबंध:भदंत धम्मदीप महाथेरो यांची सदिच्छा



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटी, डॉ. आंबेडकर नगर, महू मध्य प्रदेशचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) माननीय धम्मदीप महाथेरो व आर्या नंदादीप महाथेरो (एम. ए. पाली, बुद्धिझम अँड इकॉनॉमिक्स) यांनी सदिच्छा भेट दिली. सर्व कार्यालयाचे पाहणी करून सर्व संचालक व कर्मचारी यांचे कौतुक केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट सुनील सौंदरमल, संचालक डॉ कमलाकर कांबळे, प्रा. डी.जी धाकडे, अंबाजोगाई मेडिकल असोसिएशनचे संस्थापक डॉ. राहुल धाकडे, सेवानिवृत्त पोलीस गौतम वैद्य आणि प्रभाकरजी दहिरे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय राऊत आणि सर्व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी सर्वप्रथम मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले आणि या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट सुनील सौंदरमल यांनी केले. तसेच आर्या नंदादीप यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यांनी बोलताना सांगितले की, मी इकॉनॉमिक्सची स्टुडन्ट आहे आणि अशा प्रकारची बँक मी पहिल्यांदाच पाहिली. अतिशय उत्कृष्ट अशा संस्थेला समाजातील सर्वांनी मदत केली पाहिजे व संस्था वाढवली पाहिजे असे सूचित केले तसेच भदंत धम्मदीप महाथेरो यांनी बोलताना म्हणाले की, माझे गुरु प्रा. सुमेध बोधी यांनी या संस्थेला भेट दिलेली आहे. त्यांचा या संस्थेला आशीर्वाद होताच आणि आमचाही कायम आशीर्वाद आपल्या पाठीशी राहील. आपण अतिशय उत्कृष्ट पद्धतीने कार्य करत आहात आणि आपले संचालक हे कुशल असल्यामुळे संस्थेची वाटचाल ही योग्य दिशेने होत आहे. असेच कार्य करत रहा टिकून ठेवा तसेच समाजातील बुद्धीजीवी घटकांनी ही संस्था वाढवण्यासाठी प्रत्येकाने मदत केली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले सर्व इमारतीची पाहणी केली असता रिझर्व बँकेच्या इमारतीप्रमाणे सर्व बँकेचे रचना असल्यामुळे आणि एडवोकेट सुनील सौंदरमल व त्यांचे संचालक हे कुशल असल्यामुळे संस्थेला कुठलाही धोका होणार नाही त्यामुळे समाजातील सर्वांनी आपले व्यवहार आधार बँकेमध्येच करावे असे सुचित केले. याप्रसंगी प्राध्यापक डीजे धाकडे सर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे आभार विजय राऊत यांनी मानले.

# महायुती सरकारच्या यशाबद्दल सत्कार

## समारंभ:धनंजय मुंडे,डॉ.योगेश क्षीरसागरांकडून सत्कार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या यशाबद्दल पक्षाच्या प्रमुख नेत्यांचा राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे, पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबईतील देवगिरी निवासस्थानी भेटून सत्कार केला.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते आ.छगनराव भुजबळ यांची मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी ना.धनंजय मुंडे यांच्यासमवेत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेतली. यावेळी विधानसभा निवडणुकीत महायुती सरकार



आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या यशाबद्दल अजितदादांसह प्रमुख नेत्यांचा सत्कार केला. तसेच, परळी विधानसभेतील ऐतिहासिक विजयाबद्दल ना.धनंजय मुंडे यांचे देखील नेत्यांनी कौतुक करून अभिनंदन केले. यावेळी राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे हे देखील उपस्थित होते.

### संधी दिल्याबद्दल मानले आभार

बीड विधानसभा निवडणुकीत महायुतीचा उमेदवार म्हणून संधी दिल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सर्व पक्षश्रेष्ठींचे आभार मानले. या निवडणुकीत सर्व प्रमुख नेत्यांचे मार्गदर्शन, सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले.

# येडेश्वरी यात्रानिमित्त स्पर्धेचे आयोजन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी


खिळद ( ता आष्टी ) येथील येडेश्वरी यात्रानिमित्त ओवी ज्ञानेशाची या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे . यासाठी २९ नोव्हेंबर पर्यंत प्रवेशिका पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे .

याबाबत अधिक माहिती अशी की खिळद ( ता ) आष्टी येथील येडेश्वरी यात्राउत्सव निमित् ओवी ज्ञानेशाची या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यामध्ये ज्ञानेश्वरी ग्रंथामधील ओवीचे विश्लेषण करणे असे या स्पर्धेचे स्वरूप आहे . या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकासाठी पाच हजार रुपये , द्वितीय क्रमांकासाठी तीन हजार रुपये , तृतीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये असे बक्षीस दिले जाणार आहे . इच्छुकांनी स्पर्धेच्या माहितीसाठी ऍड बाळासाहेब बोडखे यांच्याशी ( ९४२३४७१३१२ ) या क्रमांकावर संपर्क साधावा. वयाची कोणतीही अट नसलेल्या या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त अभ्यासकांनी सहभागी होण्याचे आवाहन संयोजक बाळासाहेब बोडखे, देविदास गर्जे , पांडुरंग गर्जे , भागवत गर्जे , ऍड नितीन बोडखे आदींनी केले आहे.

# शिक्षक निघाला भलताच करामती!

## सवाल: राजकारण करुन वाळूमाफिया

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज तालुक्यातील बोरगाव येथील एका शाळेतील शिक्षकांला आचारसंहितेचे बंधन राहीले नाही कुठल्याही प्रकारचे बंधन राहीले नाही अशा शिक्षकाला निलंबित केले पाहिजे असा प्रश्न उपस्थित होतो आहे कारण बोरगाव येथील शाळेत बाहेर गावावरुन येऊन नोकरी करणारा शिक्षक राजकारण पन करतोय आचारसंहितेचे कुठलेही त्यांला बंधन राहीले नाही मग शासन काय राजकारण करण्यासाठी त्या शिक्षकाला पगार देत आहे का असा प्रश्न उपस्थित होतो आहे.तो शिक्षक एका विशिष्ट पक्षाचा आचारसंहिते मध्ये मोकाट प्रचार करतो राजकारण करतो तसेच बोरगाव येथे बाहेर गावावरुन येऊन नोकरी करणाऱ्या त्या शिक्षकाचा दोन नंबर म्हणजे वाळुमाफीया असल्याचे समजले जाते आहे भरमसाठ वाळुउपसा करत असल्याचे समजले जाते आहे अशा प्रकारे येड्या गाताडा सारख करणाऱ्या शिक्षकाला निलंबित केले पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.कारण एकीकडे राजकारण तसेच वाळुमाफीया, तसेच कुठल्याही प्रकारचे नियमाचे पालन न करणारा शिक्षक बोरगाव येथील शाळेतील विद्यार्थ्यांना काय राजकारण व वाळुउपसा कसा करायचा हे शिकवत असेल का असा ही प्रश्न उपस्थित होतो आहे अशा प्रकारे शासनाला धुळ चारत नोकरी करणाऱ्या शिक्षकावर कारवाई करण्यात यावी व निलंबित करण्यात यावे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# भुरट्या गुत्तेदारांचे साठेंच्या विरोधात काम?

## बोंबला:पैसे खाऊन महायुतीचा प्रचार?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील भुरटा एका गुत्तेदारांने पृथ्वीराज साठे यांच्या कडून प्रचारा साठी पैसे व एका बड्या नेत्यांन कडुन पन पैसे खाऊन महायुतीच्या उमेदवार नमीता लोखंडे यांचा प्रचार केल्याची चर्चा नागरिकांन मध्ये सुरू आहे . तसेच त्या भुरट्या शेंबड्या गुत्तेदाराला तालुक्यातील एका बड्या नेत्याने आज पर्यंत जोगवा वाढला पन तो भुरटा गुत्तेदार जोगव्याला सुध्दा जागला नाही त्या भुरट्या शेंबड्या गुत्तेदारानी महायुतीच्या उमेदवारांकडून पन प्रचारा साठी पैसे खाल्याचे समजले जाते आहे व महाविकास आघाडीच्या नेत्यां कडुन पन पैसे खाऊन महायुतीच्या उमेदवार आमदार नमीता मुंदडा यांचा प्रचार भन्नाट केल्याचे दिसून येते आहे नागरिकांन मधुन भावना व्यक्त केल्या जात आहेत . तसेच चिंचोली माळी येथील त्या भुरट्या शेंबड्या गुत्तेदारानी एका बड्या नेत्यांच्या जिवावर चिंचोली माळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामात व बजगुडे वस्ती रस्त्याच्या कामात व हुंबे वस्ती रस्त्याच्या कामात तसेच तालुक्यातील छोट्या मोठ्या कामात लाखो रुपयांचा भ्राष्ठाचार केल्याचे समजले जाते तरी केज तालुक्यातील बड्या नेत्याने अशा भुरट्या शेंबड्या गुत्तेदाराला हाताच्या अंतरावर ठेवले पाहिजे अन्यथा पुढील भागात बड्या नेत्याचे व गुत्तेदाराच्या नावाने बातमी प्रसिद्ध करण्यात येईल त्यामुळे भुरट्या शेंबड्या गुत्तेदाराला भ्राष्ठचार करण्यापासून रोखले पाहिजे असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# लाडकी बहीण योजनेच्या पोस्टरला काळे!

## चित्र:अनेक ठिकाणी महायुती सरकारला विरोध

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी




केज तालुक्यात अनेक ठिकाणी महायुती सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या पोस्टरला व पोस्टर वर असलेल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,मंत्री यांच्या तोंडाला काळे फासले आहे यांचे कारण काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे.महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेचे पोस्टर घराच्या भिंतीवर चिटकवले होते , आहेत तर गावातील अनेक गावातील नागरिकांनी काळे फासले आहे यांचे कारण आणखी स्पष्ट झालेले नाही का आचारसंहिते मुळे फासले म्हणावे तर आचारसंहिते चा व वयक्तीक घरावर चिकटलेल्या पोस्टर चा विषय येत नाही व तसेच लाडकी बहीण योजना ही आचारसंहितेच्या अगोदर सुरू केलेली योजना आहे व पोस्टर सुध्दा अगोदर चिटकवलेले आहे मग महायुती सरकारच्या पोस्टर वर काळे का फासले का असे तर नाही महायुतीच्या सरकार वर जनता जनार्दन नाराज आहे जर असे असेल तर आमदारा नमीता मुंदडा यांनी पैसे देऊन मते विकत घेतले व निवडणूक जिंकल्या असे स्पष्ट होताना दिसत आहे कारण लाडकी बहीण योजनेवर सुध्दा केज तालुक्यातील नागरिकांन मध्ये नाराजी आहे असे स्पष्ट होताना दिसत नागरिकांन मधुन भावना व्यक्त केल्या जात आहेत चर्चा सत्र सुरू झाले आहे.

## अनिल जगताप — मुख्यमंत्री पदावर शिंदेंची वर्णी लागावी

# राज्यात महायुतीचा अभूतपूर्व विजय

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नुकत्याचा पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामन्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात



भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले.

काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली. याप्रसंगी कृषी

पान २ वर...

# सोनीजवळ रस्ता केला भोगस!



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरातून केजडी नदीपासून गेलेला सोनीजवळा रस्ता खड्डे पडून खराब झालेला आहे. या खड्ड्यात निवडणुकीच्या धामधुमीत मुरुम मिक्स करुन खडी भरण्यात आली आहे. खड्डे भरताना खड्याला डांबराचा वास देखील दिला नाही आगदी नवीन पद्धतीने हे खड्डे भरण्यात आले आहेत परंतु खड्डे भरून काही दिवस होतात ना होतात तर त्या मुरमाचा फुपाटा होऊन ती खडी आता बाहेर येऊ लागली आहे लवकरच ते खड्डे पुन्हा वाहनधारकांना त्रास देतील म्हणून संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सुचना दिल्या तर डांबर आणि खडीने खड्डे व्यवस्थीत भरुन नंतर त्यावर पुढील काम होईल .याकडे संबंधित अधिकारी यांनी लक्ष दिले नाही तर पुढील बजेट कधी मिळेल आणि तोपर्यंत वाहनधारकांचे काय हाल होतील याचा विचार देखील न केलेला बरा आशा प्रतिक्रिया या भागातील नागरीक व वाहनचालकांमधुन येतात.हा सर्व प्रकार पाहून खड्डे भरण्यासाठी आलेल्या या नवीन फॉर्म्युल्याची या भागामध्ये चवीने चर्चा सुरू आहे.